www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

संपादक - संतोष शिवदास आमले

मुख्य संपादक - भारती आमले उपसंपादक - श्री विलास गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश पाटील सह संपादक - श्री मुकुंद कांबळे महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : ३ अंक : ६५ गुरुवार, १३ नोव्हेंबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याची प्रशासनात ताकद – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## भारतीय प्रशासकीय सेवेतील परिविक्षाधीन अधिकाऱ्यांचा मुख्यमंत्र्यांसमवेत संवाद

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** समाजातील शेवटच्या घटकाचे कल्याण हे ध्येय ठेवत त्यांच्या आयुष्यात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याची ताकद प्रशासनात आहे. त्यासाठी भारतीय प्रशासकीय सेवेचा उपयोग करावा. राज्याच्या विकासगाथेला पुढे नेण्याची जबाबदारी सार्थपणे सांभाळण्याची अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

प्रशासनात आलेल्या तुकडीने कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित तंत्रज्ञानाचा उपयोग करत नागरिक केंद्रित व जबाबदार प्रशासन व्यवस्था निर्माण करावी, असे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.

२०२४ च्या भारतीय प्रशासकीय सेवेतील आठ परिविक्षाधीन अधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी वर्षा निवासस्थानी संवाद साधला. यावेळी मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी उपस्थित होते.

संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र हे सर्वात जास्त नागरीकरण झालेले राज्य आहे. राज्यामध्ये ग्रामीण आणि नागरी विकास केंद्रित प्रशासन गरजेचे आहे. भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांकडे नागरी प्रशासनात मोठ्या प्रमाणावर काम करण्याची संधी आहे.

संतुलित व सर्वांगीण औद्योगिक विकासासाठी शासन १०० सुधारणा करीत आहे. या सुधारणांसाठी ‘ वॉर रूम’ तयार करण्यात आली आहे. महसूल सुधारणांसाठी सल्लागार नेमण्यापेक्षा प्रशासनातील दांडगा अनुभव असलेल्या अधिकाऱ्यांची समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यांच्या अनुभवाचा खूप चांगला परिणाम दिसून येत आहे,



असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

शासनाने औद्योगिक प्रयोजनासाठी राज्यामध्ये अकृषक परवाना काढण्याची मोठी सुधारणा नुकतीच केली आहे. वेळखाऊ आणि क्लिष्ट प्रक्रिया दूर करीत राज्यात गतिमान प्रशासन देण्यावर शासनाचा भर आहे. महसूल विभाग अंतर्गत बरीच प्रक्रिया, सेवा ब्लॉक चेन पद्धतीवर आणण्यात येत आहे. त्यामुळे बऱ्याच प्रक्रिया जलद व अचूक होत आहेत, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, संपूर्ण प्रशासकीय धोरणे, प्रक्रिया यांचे ‘ व्हिजिट’ करून ‘ रिइंजिनिअरिंग’ करण्यासाठी शासनाने १५० दिवसांचा कार्यक्रम आखला आहे. या माध्यमातून बऱ्याच सुधारणा करण्यात येत आहेत. राज्यात सार्वत्रिक औद्योगिक विकास होण्यासाठी गुंतवणूक वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. मुंबई, पुणे प्रमाणेच छत्रपती संभाजी नगर, नागपूर, नाशिक यासह राज्यात अन्य भागात नवीन औद्योगिक पट्टे निर्माण करण्यात येत आहे. विदर्भामध्ये नागपूर – अमरावती औद्योगिक विकासाचा पट्टा तयार होत आहे. अमरावतीमध्ये पीएम मित्रा पार्क तसेच वस्त्रोद्योग पार्कमुळे औद्योगिक विकासाची परिसंस्था निर्माण करण्यात येत आहे. त्याचा परिणाम म्हणून अमरावती जिल्ह्यातील नांदगाव पेठ औद्योगिक वसाहतीत आज एकही भूखंड शिल्लक राहिलेला नाही. अमरावती विमानतळ नागरी वाहतुकीसाठी खुले करण्यात आले आहे. या ठिकाणी एअर इंडियाच्यावतीने आशिया खंडातील सर्वात मोठे ‘पायलट ट्रेनिंग इन्स्टिट्यूट’ उभारण्यात येत आहे.

दुर्गम, नक्षलग्रस्त असलेल्या गडचिरोलीची ओळख आता ‘स्टील सिटी’ म्हणून होत आहे. या जिल्ह्यात तीन लाख कोटींचे सामंजस्य करार उद्योगांसाठी करण्यात आले आहेत. समृद्धी महामार्गाने राज्याची राजधानी व उपराजधानी जोडली आहे. त्यामुळे गतीने दळणवळण यंत्रणा निर्माण झाली आहे. मराठवाड्याच्या विकासासाठी शक्तीपीठ महामार्ग महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. टोयोटा किर्लोस्कर कंपनी छत्रपती संभाजीनगरमध्ये प्रकल्प स्थापन करीत आहे. त्यामुळे या भागात विकासाची परिसंस्था अधिक बळकट होणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्र्यांनी यावेळी परिविक्षाधीन अधिकाऱ्यांचा परिचय करून घेतला. त्यांचा आतापर्यंतचा प्रवास, मागील अनुभव, महाराष्ट्रात काम करत असताना जाणवलेल्या चांगल्या बाबी, सुधारणा करणे गरजेचे असलेल्या बाबी याविषयीही विस्तृत संवाद साधला.

## जेष्ठ पत्रकार रमेश भोळे यांना इंटरनॅशनल अचिव्हर्स अवार्ड जाहीर

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघ नाशिक यांच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त दर वर्षी महाराष्ट्रातील आपापल्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना इंटरनॅशनल अचिव्हर्स अवार्ड पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. या वर्षीचा पत्रकारिता क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ज्येष्ठ पत्रकार रमेश भोळे यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे.

रमेश भोळे हे अनेक वर्षे पत्रकार, संपादक म्हणून ते काम पाहत आहेत. साईंचे सोबती या पुस्तकांचे ते लेखक असून दरवर्षी दिवाळी अंकां मध्ये तसेच साईलीला अंकांमध्ये त्यांचे अनेक लेख कथा प्रसिद्ध झाल्या आहेत. रमेश भोळे यांच्या पत्रकारिता



क्षेत्रातील कार्याची दखल घेत त्यांना इंटरनॅशनल अचिव्हर्स अवॉर्ड जाहीर करण्यात आला आहे.

हा राष्ट्रीय पुरस्कार सोहळा मंगळवार दिनांक 6 जानेवारी रोजी दुपारी अडीच वाजता श्री साईबाबांची पुण्यभूमी शिर्डी येथे मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

पत्रकार रमेश भोळे यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याने सर्वस्तरातून त्यांचे हार्दिक अभिनंदन होत आहे.

## अंध महिला क्रिकेट विश्वचषकात महाराष्ट्राचा झेंडा – गंगा कदम उपकर्णधार!

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी):** क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड ऑफ महाराष्ट्र संस्थेने कळविले आहे की दृष्टिबाधित महिला क्रिकेट खेळाडूंची विश्वचषक स्पर्धा दिनांक ११ नोव्हेंबर ते २३ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत भारत आणि श्रीलंका येथे आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचा उद्घाटन सामना उद्या नवी दिल्ली येथे खेळविण्यात येणार आहे. महिला अंध क्रिकेटच्या इतिहासातील हा अत्यंत ऐतिहासिक आणि अभिमानास्पद क्षण ठरणार आहे.महाराष्ट्रासाठी ही मोठ्या गौरवाची बाब आहे की, महाराष्ट्रातील कुमारी गंगा कदम यांची भारतीय महिला संघाच्या उपकर्णधारपदी निवड झाली असून त्या उद्घाटन सामन्यात भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. त्यांच्या नेतृत्वगुणांमुळे, क्रीडाप्रेमामुळे आणि समर्पणामुळे महाराष्ट्रातील दृष्टिबाधित मुलींसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण झाले आहे.क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड ऑफ महाराष्ट्र ही संस्था सन २०११ साली स्थापन झाली असून ती क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड इन इंडिया या राष्ट्रीय संघटनेशी संलग्न आहे. संस्थेमार्फत दरवर्षी शालेय, विभागीय आणि राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबिरे तसेच स्पर्धांचे आयोजन केले जाते. या माध्यमातून अनेक महिला आणि युवक खेळाडूंनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व केले आहे.

> **महाराष्ट्रातील अनेक खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले असून काही खेळाडू शासकीय सेवांमध्ये कार्यरत आहेत, तर काहींनी क्रीडा क्षेत्रात अधिकारी म्हणूनही आपली छाप उमटवली आहे. हे यश क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड ऑफ महाराष्ट्रच्या सततच्या प्रयत्नांचे आणि समर्पित कार्याचे फलित आहे.दृष्टिबाधित खेळाडूंना समान संधी, कौशल्यविकास आणि आत्मनिर्भरता मिळावी यासाठी ही संस्था अखंड प्रयत्नशील आहे.**
>
> **– पंकज चौधरी. अध्यक्ष**
> **क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड ऑफ महाराष्ट्र**
> **(क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड इन इंडिया संलग्न संस्था)**

## उदयगिरीच्या केतकी चवळेची शालेय राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी जोगेंद्र सोमवंशी लातूर.**

**उदगीर:** महाराष्ट्र उदयगिरी कनिष्ठ महाविद्यालय उदगीर येथील खेळाडू कु. केतकी चवळे यांनी क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य आणि जिल्हा क्रीडा कार्यालय अंतर्गत नांदेड येथे संपन्न झालेल्या शालेय विभागीय 19 वर्षाखालील तलवारबाजी ( क्रीडा प्रकार सेबर ) स्पर्धेत सांघिक प्रथम तर वैयक्तिक तृतीय क्रमांकाने विजेतेपद पटकावले आहेत. या यशाबद्दल महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर यांच्या हस्ते कु. केतकी चवळे यांचा ग्रंथ, शॉल व बुके देऊन सत्कार करण्यात



आला व पालक विजयकुमार चवळे यांचाही संस्था व महाविद्यालयाच्या वतीने सन्मान करण्यात आला.

यावेळी संस्थेचे सहसचिव प्रशांत पेन्सलवार, प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, उपप्राचार्य डॉ. एस. एन. हल्लाळे, उपप्राचार्य प्रा. शिवशंकर कोडचे, डॉ. कमलाकर गव्हाणे उपस्थित होते. सदर खेळाडूची संभाजीनगर येथे होणाऱ्या शालेय राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूला क्रीडा संचालक प्रा. सतिश मुंढे, प्रा. रमजू शेख यांनी मार्गदर्शन केले आहे. त्याबद्दल खेळाडूचे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे सर्व पदाधिकारी आणि महाविद्यालयाच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## इंडियन ऑइल अदानी व्हेंचर लिमिटेड (IOAVL) मध्ये मोटार स्पिरीट लिक्विड तेलाचीगळती

**बेलापूर आणि उरण दरम्यान उपनगरीय रेल्वे सेवा बंद करणे**

**दैनिक युवक आधार**

**महारष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील**

भोपाळयेथे झालेल्यावायू गळतीला सुमारे41 वर्षाचा कालावधी झाला, येथील युनियन साद्रसदारकार्बाइडच्या कारखान्या मधील वायुगळतिचे थरार आणि अनुभव भोपळवासिंनी अनुभवला आहे. काहीशा फरकाने उरण तालुका याच मार्गावर आहे. ओएनजीसी, बीपीसीएल, जेएनपीटी परिसरातील खनिज तेलाचे, नैसर्गिक वायूचे, घातक रसायनांचे थरार अजून उरणकरांना अनुभवायचे आहेत. डोळयावर अर्थपूर्ण झापडे बसवून जनतेच्या जीवाशी खेळ खेळून आपला स्वार्थ साधणारे शासनाचे अधिअकारी,



आपत्कालीन सेवेचे अधिकारी पर्यावरण नियंत्रण महामंडळाचे अधिकारी, औद्योगिक सुरक्षा विभागाचे अधिकारी आणि वन खात्याचे अधिकारी यांचा सुरु असणारा लाचारपणा उरणकरांनीडोळयांनी पाहावयाचा आहे, परंतु तो कधी ? या आपत्ती नंतर तुम्ही जिवंत असाल तर ? भोपाळ कांडा मध्ये मृत व्यक्तींची प्रेते तरी सापडली पण उरणमध्येअग्नी कांड झालेच तर तुमचा आमचा झालेला कोळसाही सापडणार नाही याची जाणीव आपणा सर्वांना असायला हवी. तरी सुद्धा शासकीय यंत्रणेचे अधिकारी म्हणतात उरण ऑल इज वेल. उरण मध्ये वरउल्लेख केलेले अनेक कारखाने कंपन्या आणि कन्टेनर गोदामे आजही रसायनाने भरलेली आहेत अनेक प्रकारची ज्वालाग्रही रसायने पैट्रोलियाम पदार्थाच्या, रासायनिक द्रव्याच्या, एलपीजी गॅस पाईप लाईनउघड्यावर आहेत अनेक वेळा या पाईप लाईन्स टॅपिंग करून अनेक रसायनाच्या चोऱ्या झाल्या आहेत तर कधी पाईप लाईन सडल्यामुळे लिकेज झाल्या आहेत आज दि 12 नोव्हेंबर 2025 रोजी सकाळी 05 वाजण्याच्या सुमारास खारकोपर आणि उरण दरम्यान खांब क्रमांक52/34-36 (न्हावा शेवा रेल्वे स्टेशनजवळ) येथे 24 इंची व्यासाची मोटरगाड्या साठी वापरण्यात येणाऱ्या फ्युयल स्पिरिटची पाईप लाईन फुटल्यामुळे, परिसरात घबराट निर्माण झाली.सदरची पाईप लाईन रेल्वे लाईनला 12 मीटर समांतर जात असल्याने.खबरदारीची उपाय योजना म्हणून उरण-बेलापूर दरम्यान उपनगरीय रेल्वेगाड्यांची वाहतूक पुढील आदेशापर्यंत रात्री 11:30 वाजेपर्यंत पूर्णपणे थांबवण्यात आली आहे. इंडियन ऑइल अदानी व्हेंचर लिमिटेड (IO-AVL) ला सकाळी 05:00 वाजता पाईपलाईन मध्ये गळती झाल्याचे लक्षात आले जेएनपीटी बंदरातील पाइपलाइनचे काम थांबवण्यात आले. बीपीसीएल लिक्विड जेट्टी येथील जहाजातून आयओएव्हीएल टँक फार्म, धुतूम येथे मोटर स्पिरिट उतरवले जात होते. इंडियन ऑइल अदानी व्हेंचर लिमिटेडच्या टीमने दुपारी 2 वाजता गळतीचे ठिकाण शोधून काढले आणि उपाययोजना सुरू केल्या आहेत.सादर घटनेची माहिती मिळताच सिडको अग्निशमन दलाच्या दोन व ओएनजीसी अग्निशमन दलाची एक गाडीघटना स्थळी दाखल झाली सिडको द्रोणागीरीच्या अग्निशमन दलाचे प्रमुख अमित कांबळे यंच्या मार्गदर्शनाखाली पसरलेल्या लिक्विड मोटारस्पिरीट रसायनावर फोम मारून आगप्रतीबंधक उपाय योजना करण्यात आली परिस्थिती नियंत्रणात असल्याचे समजते.



# नवीन पनवेल मधील रस्त्यांची दुरावस्था, ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : पनवेल महानगरपालिका हद्दीतील नवीन पनवेल येथील रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. सेक्टर एक ते पाच पर्यंत सर्व रस्ते खड्डेमय झाले आहेत. याचा त्रास सहन चालकांना होत आहे.

नवीन पनवेल शहरातील रस्ते काही महिन्यापूर्वी बनवले होते. मात्र पावसाळ्यात या रस्त्यांवर खड्डे पडले. त्यानंतर थोड्याफार प्रमाणात येथील खड्डे बुजवण्यात आले मात्र पुन्हा येथे रस्त्यांवर खड्डे पडल्याने ठेकेदाराच्या कामावर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. याकडे पालिकेने लक्ष देणे गरजेचे आहे. नविन पनवेल परिसरात महापालिकाच्या भोंगळ कारभाराचा फटका करदात्या नागरिकांना सोसावा लागत आहे. परिसरातील अनेक



रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. खड्ड्याचा अंदाज येत नसल्याने दिवसेंदिवस अपघातांमध्ये वाढ होण्याचे प्रमाण वाढले आहे.

नागरिकांना गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून खड्डेमय रस्त्यातून प्रवास करावा लागत आहे. पालिकेने या ठेकेदारावर कारवाई करणे अपेक्षित असताना तसे होताना दिसत नाही.

रस्त्यावरील डांबर थोड्याच महिन्यात निघून गेल्याने ठेकेदाराने कामात भ्रष्टाचार केला असल्याचे बोलले जात आहे. आदई गावाच्या कमानीजवळील रस्ता देखील खड्ड्यात गेला आहे. आदई सर्कल कडे जाणारा रस्ता खड्डेमय झाला असून त्यामुळे वाहतूक कोंडी होत आहे. संपूर्ण नवीन पनवेल शहरच खड्ड्यात गेल्याने पालिका काय करते असा सवाल उपस्थित झाला आहे. या ठेकेदारावर कारवाई करून लवकरात लवकर खड्डे बुजवावे अशी मागणी केली जात आहे.

# ट्रेलरचालकाची हाईटगेजला धडक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर** : पनवेल-जेएनपीटी हायवे रोडवर ट्रेलरचालकाने निष्काळजीपणाने ट्रेलर चालवुन रोडवर असलेल्या हाईटगेजला ठोकर दिली. याघटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. ट्रेलरचालक विनोदकुमार यादव (वय ४० वर्षे) याने त्याच्या ताब्यातील ट्रेलर रस्त्याच्या परिस्थीतीकडे दुर्लक्ष करून बेदरकारपणे, निष्काळजीपणाने चालवुन रोडवर असलेल्या हाईटगेजला ठोकर दिली. यामध्ये हाईटगेजचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात ट्रेलरचालकाविरुद्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पुढील तपास पोलीस हवालदार जितीन खरात करत आहेत.

# अपोलोने भारत-दक्षिण आशियाई आरोग्य क्षेत्रात नवा मापदंड स्थापित केला

## ५००० यकृत प्रत्यारोपण पूर्ण करून गाठला ऐतिहासिक टप्पा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी** : अपोलो हॉस्पिटल्स ग्रुपने आज भारत आणि दक्षिण आशियातील आरोग्य देखभाल क्षेत्रामध्ये एक अभूतपूर्व कामगिरी केली आहे. 'अपोलो लिव्हर ट्रान्सप्लांट प्रोग्राम' अंतर्गत ५,००० यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया (liver transplants) यशस्वीरित्या पूर्ण करणारा अपोलो हॉस्पिटल्स ग्रुप हा भारतातील आणि दक्षिण आशियातील पहिला रुग्णालय समूह बनला आहे. हा महत्त्वपूर्ण टप्पा २५ वर्षांहून अधिक काळ वैद्यकीय क्षेत्रात प्रस्तुत केल्या गेलेल्या नवकल्पना, करुणामय काळजी आणि ५० हून अधिक देशांमधील यकृताच्या शेवटच्या टप्प्यातील आजाराशी लढा देणाऱ्या व्यक्तींसाठी आशेचा किरण आहे.

अपोलो हॉस्पिटल्सने १५ नोव्हेंबर १९९८ रोजी भारतातील पहिले बाल (पीडियाट्रिक) यकृत प्रत्यारोपण यशस्वीरित्या पार पाडले आणि भारत व दक्षिण आशियामध्ये उपलब्ध असलेले यकृतावरील उपचार, वैद्यकीय देखभाल यांची एक नवी व्याख्या लिहून एक वारसा निर्माण केला. ही प्रक्रिया ज्याच्यावर केली गेली तो संजय, त्यावेळी अवघा २० महिन्यांचा होता आणि त्याला पित्त




नलिकेच्या अविकसितपणामुळे (biliary atresia) त्रास होत होता. एका जीवघेण्या आजाराशी लढा देणारा बालरुग्ण ते आज एक प्रॅक्टिसिंग डॉक्टर आणि वडील बनण्यापर्यंतचा त्याचा प्रवास दर्शवतो की, अपोलोच्या आरोग्य सेवा प्रणालीमध्ये केवळ व्यक्तींचेच नव्हे, तर कुटुंबे आणि समुदायांचे जीवन बदलण्याची अचाट शक्ती आहे.

अपोलो हॉस्पिटल्स ग्रुपचे संस्थापक आणि अध्यक्ष डॉ. प्रताप सी. रेड्डी यांनी सांगितले,"ही कामगिरी म्हणजे भारतीय आरोग्यसेवा क्षेत्रात किती आणि कोणत्या क्षमता आहेत, याची पुन्हा पुन्हा नवी व्याख्या रचण्याच्या आमच्या अदम्य वचनबद्धतेचे प्रतीक आहे. जेव्हा आम्ही 1998 मध्ये आम्ही केलेल्या पहिल्या यशस्वी प्रत्यारोपणाचा आनंद साजरा केला, तेव्हा मी अशा भविष्याचे स्वप्न पाहिले होते, जिथे प्रत्येक गरजू रुग्णाला, तो कोणत्याही भूप्रदेशात असला तरी जागतिक दर्जाचे उपचार मिळू शकतील. 5,000 यकृत प्रत्यारोपणे पूर्ण करणे, हा ते स्वप्न पूर्ण झाल्याचा पुरावा असून, आमचे कुशल आणि अथक प्रयत्नशील वैद्यकीय कर्मचारी आणि कर्मचाऱ्यांच्या परिश्रमांचे हे फलित आहे."

दोन दशकांहून अधिक काळामध्ये, अपोलोच्या प्रत्यारोपण कार्यक्रमांनी वैद्यकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण प्रगती केली आहे. या कार्यक्रमांतर्गत अनेक गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करण्यात आल्या आहेत, जसे की, एबीओ-असंगत (ABO-incompatible) प्रत्यारोपण आणि यकृत व मूत्रपिंड या दोन्ही अवयवांचे एकाच वेळी यशस्वी प्रत्यारोपण. प्रौढ रुग्णांबरोबरीने लहान मुलांवरही अपोलोमध्ये यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. यामध्ये केवळ ४ महिन्यांच्या आणि फक्त ३.५ किलो वजनाच्या बालकांचाही समावेश होता. देशातील वैद्यकीय क्षेत्रावर या कार्यक्रमाने निर्माण केलेल्या मोठ्या प्रभावाची दखल घेऊन, भारत सरकारने अपोलो लिव्हर ट्रान्सप्लांट प्रोग्रामला विशेष सन्मानित केले आहे. भारत सरकारतर्फे टपाल तिकीट जारी करून गौरवण्यात आलेला हा एकमेव लिव्हर ट्रान्सप्लांट कार्यक्रम आहे.

डॉ.मधू शशीधर,अध्यक्ष-मुख्य कार्यकारी अधिकारी,अपोलो हॉस्पिटल्स ग्रुप म्हणाले,"हा कार्यक्रम केवळ किती रुग्णांवर उपचार झाले यावर मोजला जाऊ नये. त्या कार्यक्रमामुळे नवीन डॉक्टर घडत आहेत, महत्त्वाचे वैद्यकीय संशोधन होत आहे आणि वैद्यकीय क्षेत्रासाठी नवीन मापदंड निर्माण होत आहेत. हे यश केवळ अपोलोसाठी नव्हे तर संपूर्ण भारताच्या वैद्यकीय प्रगतीसाठी प्रेरणादायी आणि महत्त्वाकांक्षा निर्माण करणारे आहे."

अपोलो लिव्हर ट्रान्सप्लांट प्रोग्रामअंतर्गत १५ नोव्हेंबर १९९८ ते १० ऑक्टोबर २०२५ या कालावधीत ५,००१ यकृत प्रत्यारोपणे यशस्वीरित्या पूर्ण केली गेली. यामध्ये ४,३९१ प्रौढ आणि ६११ बालकांवरील प्रक्रियांचा समावेश आहे. तसेच, ७०० मृत दात्यांकडून आणि ७३ यकृत-मूत्रपिंड एकत्र प्रत्यारोपणे करण्यात आली आहेत. या कार्यक्रमाचा नैदानिक (clinical) यश दर ९०% पेक्षा जास्त असून, प्रगत तंत्रज्ञान, बहुविद्याशाखीय कौशल्य आणि प्रत्यारोपण समन्वयकांचे मजबूत राष्ट्रीय जाळे यामुळे हा कार्यक्रम जगातील एक सर्वोत्तम कार्यक्रम मानला जातो.

# मागासवर्गीय म्हाडा इमारतींचा रखडलेला पुनर्विकास योजना; स्वयं पुनर्विकासाबाबत म्हाडा कार्यालयात बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**

**मुंबई /प्रतिनिधी :** मागासवर्गीय समाजासाठी युद्धोत्तर पुनर्वसन योजनेतून उभ्या रहिलेल्या इमारतींच्या स्वयंपुनर्विकासाच्या प्रश्नावर नुकतीच म्हाडा कार्यालयात केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री खा. रामदास आठवले यांच्या अध्यक्षतेखाली आणि महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयं/समूह पुनर्विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष आ. प्रविण दरेकर यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. यावेळी आठवले यांनी महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयं/ समूह पुनर्विकास प्राधिकरणाच्या कार्यालयालाही सदिच्छा भेट दिली.

या बैठकीला आरपीआय आठवले गटाचे मुंबई प्रदेश अध्यक्ष सिद्धार्थ कासारे, उत्तर मुंबईचे जिल्हा प्रमुख रमेश गायकवाड यांसह संबंधित



विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बैठकीत आ. दरेकर यांनी समाजकल्याण विभागाच्या शासन निर्णयातील जाचक अटींमुळे कन्नमवार नगरमधील अनेक इमारतींचा पुनर्विकास रखडलेला आहे. युद्धोत्तर पुनर्वसन योजने अंतर्गत मागासवर्गीय ग्राहकांना ठराविक इमारतींमध्ये घरे खरेदी करण्यासाठी. शासकीय संस्थेच्या माध्यमातून कर्ज दिले होते. समाजकल्याण विभागाने १० टक्के अनुदान दिले होते. याच आधारे मुंबईतील दीडशे गृहनिर्माण संस्थांना पुनर्विकास करण्यासाठी समाजकल्याण विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र बंधनकारक करण्यात आले होते. हे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी २०२३ च्या शासन निर्णयात समाजकल्याण विभागाने जाचक अटी घातल्या आहेत. या अटी पूर्ण होणे शक्य नसल्याने मुंबईतील १५० इमारतींचा पुनर्विकास रखडलेला आहे. पुनर्विकास रखडल्याने कन्नमवार नगर येथील इमारत क्रमांक २१५ ने मुंबई हायकोर्टात याचिका दाखल केली होती. या इमारतीत मागासवर्गीय ग्राहकांनी घरे घेतल्यानंतर योजनेत अनेक सुधारणा झाल्या. या सुधारित योजनेचा लाभ इमातीने घेतलेला नाही. त्यामुळे हा शासन निर्णय या इमारतीला लागू होत नसल्याचे हायकोर्टाने निकालात म्हटले असल्याच्या बाबी निदर्शनास आणून दिल्या.

# नविन पनवेलमध्ये उड्डाणपूल बांधण्याची रिपाई पनवेल शहर अध्यक्ष निलेश सोनावणे यांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : नवीन पनवेल शहरात वाढत्या वाहतूक कोंडीच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) गटाचे पनवेल शहर अध्यक्ष निलेश सोनावणे यांनी मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य नगरविकास विभाग, पनवेल महानगरपालिका आयुक्त यांचेकडे निवेदन दिले आहे. या निवेदनात नवीन पनवेल एचडीएफ सर्कल ते आदई सर्कल असा उड्डाणपूल बांधण्याची मागणी करण्यात आली आहे.

रिपाइं पनवेल शहर अध्यक्ष निलेश सोनावणे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नविन पनवेलमध्ये दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत असल्याने वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली आहे. नवीन पनवेल परिसरात राहणाऱ्या लोकांना तसेच नवीन पनवेल मधुन सुकापूर, नेरे वाकडी, हरीग्राम ,देहरंग या ठिकाणी जाणाऱ्या तसेच पनवेल महानगर पालिकेने विकसित केलेल्या



दिलीप वेंगसरकर अकॅडमी येथे जाणाऱ्या नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. पनवेल-माथेरान रस्ता जरी मोठा असला तरी त्याच्या दुतर्फा वाहतूक कोंडी ही नित्याची झाली आहे. यामुळे शाळेच्या विद्यार्थ्यांना शाळेत पोहोचण्यासाठी उशीर होतो , अनेक वेळा रुग्णवाहिकांना वाहतूक कोंडीत अडकावे लागते. इंधनाचा अपव्यय, प्रदूषण यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे.

त्यामुळे नवीन पनवेल एचडीएफ सर्कल ते आदई सर्कल उड्डाणपूल बांधण्यात यावा अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) गटाचे पनवेल शहर अध्यक्ष निलेश सोनावणे यांनी केली आहे

# उद्यमशिलतेतून महिलांनी सक्षम व्हावे - जिल्हाधिकारी किशन जावळे

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर)** : उद्यम शिलतेतून सक्षम व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी भारतीय उद्योजकता विकास संस्था (ईडीआय) अहमदाबाद उदया प्रकल्प कार्यालय अलिबाग व टाटा कम्युनिकेशन्स मुंबई पुरस्कृत नावडे पनवेल को ऑफ इंडस्ट्रीज सभागृह पनवेल येथे आयोजित महिलांकरीता उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमात केले.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून पनवेल तहसिलदार मिनल भांबरे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी.एस.हरळया, रायगड जिल्हा बँक तळोजाचे व्यवस्थापक नितेश तोंडसे, उद्योजक विजय लोखंडे, उद्योजक लक्ष्मण जाधव सामाजिक कार्यकर्त्या व उद्योजिका श्रीमती राजश्री पाटील उपस्थित होते.

भारतीय उद्योजकता विकास संस्था (ईडीआय) व टाटा कम्युनिकेशन्सच्या सामाजिक दायीत्व विभागाकडून पुरस्कृत उदया प्रकल्पांतर्गत दोन आठवडे कालावधीचे महिला व दिव्यांगांकरीता उद्योजकता विकास कार्यक्रम घेण्यात आला होता. कार्यक्रमात सर्व प्रथम ईडीआयचे प्रकल्प अधिकारी शशिकांत दनोरीकर यांनी जिल्हाधिकारी किशन जावळे यांना पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

प्रशिक्षणामध्ये सहभागी प्रशिक्षणार्थींना जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याहस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात येवून नावडे येथील महिला प्रशिक्षणार्थींनी सुरु केलेल्या माऊली भाकरी सेंटर चे उद्घाटन जिल्हाधिकारी श्री.जावळे यांच्याहस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाकरीता रायगड जिल्हा बँकेचे व जिल्हा उद्योग केंद्राचे मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन ईडीआय अलिबाग प्रकल्प अधिकारी शशिकांत दनोरीकर यांनी केले. या कार्यक्रमाला महिला प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# मूल्यवर्धन प्रशिक्षणाचा आज झाला समारोप

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी व्ही डी खुडे**

मूल्यवर्धन प्रशिक्षण दिनांक 10नोव्हेंबर 2025पासून सुरु होते आज दिनांक 12 नोव्हेंबर रोजी तीन दिवशीय प्रशिक्षणाचा शेवटचा दिवस होता. हे प्रशिक्षण तालुक्यातील सर्व शिक्षकांचे होणार असून पहिल्या बॅच चे 7केंद्रातील 50%या प्रमाणे शिक्ष कांची उपस्थिती होती उर्वरित शिक्षकांचे उद्या दिनांक 13 नोव्हेंबर पासून सुरु होणार आहे या प्रशिक्षण समारोपीय कार्यक्रम मध्ये सुरेश सोनुने साहेब गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती कळमनुरी, शिक्षण विस्तार अधिकारी बालाजी गोरे साहेब,मूल्यवर्धन प्रशिक्षण राज्य सुलभक परमेश्वर दिपके राज्य सुलभक मूल्यवर्धन प्रशिक्षक



हिंगोली क्षीरसागर केंद्रप्रमुख मासोड,शिंदे सर के प्र ढोलक्याची वाडी,रणवीर के मू अ मसोड, बी एन बेद्रे सर के प्र सालेगाव,व्यवहारे सर के प्र नंदापुर,मूल्यवर्धन प्रकल्प जिल्हा समन्वयक सुमेध भालेराव विजय खुडे तालुका प्रकल्प समन्वयक कळमनुरी. अंभोरे सर साधनव्यक्ती उपस्थित होते

> “ मूल्यवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमातून देशाची सामंजस, संवेदनशील सजग पिढी घडवण्यासाठी दिशा मिळेल.विविध जीवन कौशल्य विद्यार्थ्यांत निर्माण करणे हा शिक्षणाचा उद्देश आहेच याशिवाय एखाद्या नागरिकाला, व्यक्तीला, मुलांना,माणसाला माणसासारखं जगण्यास शिकवणे हा गुण मूल्यशिक्षणातून रुजवायचा आहे.याच जीवनमूल्यांचा उपयोग सशक्त पिढी आणि विकसित भारत घडवण्यासाठी होणार आहे.या प्रशिक्षणात प्रत्येक शिक्षक उत्साहाने सहभागी झाला असून प्रत्येक कृती, प्रत्येक बाब मनापासून आत्मसात करून अत्यंत उत्साहाने प्रभावी पद्धतीने आपल्या वर्गामध्ये विद्यार्थ्यांपर्यंत पोचवतील आणि सशक्त समृद्ध मूल्याधिष्ठित महाराष्ट्र घडवतील अशी शास्वती याप्रसंगी निर्माण झाली आहे.सर्व शिक्षक बांधवांना पुढील कार्यास शुभेच्छा.
>
> - परमेश्वर दिपके, राज्य सुलभक मूल्यवर्धन प्रशिक्षक हिंगोली

# दुकानाचे शटर उचकटून गल्लयातून रोकड लंपास

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर)** : हॉटेलच्या दुकानाचे शटर उचकटून अज्ञात चोरट्याने गल्ल्यातील ७० हजार रुपये चोरून नेले. या प्रकरणी खांदेश्वर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लवेश सोनवणे यांचा प्रजापती आर्केड, से-१५, नवीन पनवेल येथे कॅफे लविस्ता हॉटेल आहे. नेहमीप्रमाणे कामगार हॉटेल उघडण्यासाठी आला असता, त्याला शटर उचकटले असल्याचे दिसून आले. यावेळी सोनवणे यांनी हॉटेलमध्ये पाहिले असता, गल्ल्यातील ७० हजार रूपयांची रोकड लंपास असल्याची बाबत उघडकीस आली.

# कामोठेमध्ये पाच ठिकाणी दैनिक बाजार उभारणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी)** : सिडकोचा अनेक ठिकाणचा विकास हा फक्त कागदावर होता; मात्र पनवेल महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर तो विकास प्रत्यक्षात उतरतो आहे. भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून आपण सर्व जण हा विकास वेगाने व्हावा यासाठी कार्यरत आहोत, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. ते कामोठे येथे आयोजित दैनिक बाजारांच्या भूमिपूजन कार्यक्रमात बोलत होते. पदाधिकारी आणि कार्यकर्ते हेच खऱ्या अर्थाने विकासाचे शिल्पकार आहेत. त्यांच्या प्रयत्नांमुळेच आज अनेक विकासकामे मार्गी लागत आहेत, असेही त्यांनी यावेळी नमूद केले. पनवेल महानगरपालिकेच्या वतीने कामोठे परिसरात पाच ठिकाणी दैनिक बाजार उभारण्यात येणार आहेत.




एकूण ₹८ कोटी ८४ लाख ६ हजार ४८३ रुपयांच्या निधीतून हे काम करण्यात येणार असून, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाने यासाठी पाठपुरावा केला. त्यानुसार हे काम मंजूर झाले असून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत माजी नगरसेवक दिलीप पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन पार पडले. या कार्यक्रमाला पनवेल महानगपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे कामोठे मंडल अध्यक्ष विकास घरत, पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंझारराव, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विजय चिपळेकर, कुसुम म्हात्रे, हेमलता गोवारी, जिल्हा चिटणीस विद्या तामखेडे, कामोठे मंडळ सरचिटणीस हर्षवर्धन पाटील, भाजप नेते प्रदीप भगत, राजेश गायकर, सुशील शर्मा, रवी गोवारी, भाऊ भगत, पल्लवी पाटील, सुरेखा लांडे, वर्षा शेलार, जैनकुमार डिंगोरे, मयूर मोहिते, संतोष म्हात्रे, चंद्रकांत कडू, सुरेश खरात, मनोहर शिंगाडे, तुलसा घरत आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

# विद्यार्थिनींने सापडलेले मंगळसूत्र केले पोलिस स्टेशनमध्ये परत; स्वाती धनजे हीच्या प्रामाणिकपणाचे होत आहे कौतुक

**दैनिक युवक आधार**

**उमेश साखरकर**

**दिग्रस तालुका प्रतिनिधी**

दिग्रस शहरात एक आदर्श घटना समोर आली असून विद्यार्थिनीच्या प्रामाणिकपणा आणि पोलिसांच्या तत्पर कार्याची सर्वत्र प्रशंसा होत आहे.

शिवाजीनगर, दिग्रस येथील देवानंद राऊत यांनी दिनांक 03 नोव्हेंबर 2025 रोजी कपडे धुण्यासाठी लॉण्ड्रीवर दिले होते. संबंधित कपड्यांच्या खिशात १ लाख ६७ हजार रुपये किमतीचे १६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र राहिले असल्याची त्यांना कल्पना नव्हती. दरम्यान ते रस्त्यात कुठेतरी गहाळ झाल्याचे लक्षात येताच राऊत यांनी विविध ठिकाणी शोध




घेतला, परंतु मंगळसूत्राचा काहीच थांगपत्ता लागला नाही.

दरम्यान हेच मंगळसूत्र बुटले कॉलेजमधील बी.ए. फायनलची विद्यार्थिनी स्वाती दीपक धनजे (रा. माळहिवरा) हिला रस्त्यावर सापडले. तिने क्षणाचाही विलंब न करता अत्यंत प्रामाणिकपणे ते दिग्रस पोलीस ठाण्यात जमा केले.

पोलीसांनी प्राप्त झालेल्या मंगळसूत्राची पडताळणी करून त्याचे मूळ मालक देवानंद राऊत यांना संपर्क साधला. त्यांना पोलीस ठाण्यात बोलावून मंगळसूत्र परत करण्यात आले. विद्यार्थिनी स्वाती धनजे हिच्या प्रामाणिकपणाबद्दल दिग्रस पोलिसांनी तिचा सत्कार करून आभार व्यक्त केले.दिग्रस पोलिसांच्या अशा पारदर्शक व संवेदनशील कामगिरीमुळे नागरिकांमध्ये पोलिसांबद्दलचा विश्वास अधिक दृढ होत असून, नागरिकांना देखील चांगले कार्य करण्याची प्रेरणा मिळत आहे. या घटनेची चर्चा सध्या संपूर्ण दिग्रस शहरात जोरदार सुरू आहे.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

**daily YUVAK ADHAR** Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## राज्यस्तरीय शिक्षक वक्तृत्व स्पर्धेत कैलास तुपे विजेते

**दैनिक युवक आधार**
**शिरूर कासार प्रतिनिधी** : भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७ नोव्हेंबर शाळा प्रवेश दिनानिमित्त नालंदा फाउंडेशन बीड यांनी महाराष्ट्र राज्यातील शिक्षकांसाठी खुली राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा दिनांक ९ नोव्हेंबर रोजी तुलसी शैक्षणिक समूह बीड येथे आयोजित केली होती. या स्पर्धेत शिरूर कासार तालुक्यातील शिक्षक शिवचरित्रकार कैलास तुपे तृतीय क्रमांक मिळवत विजेते ठरले. या स्पर्धेत राज्यातून अनेक जिल्ह्यातील शिक्षक स्पर्धक म्हणून सहभागी झाले होते. 'मूल्यशिक्षण संस्कारात शिक्षकाची भूमिका' या विषयावर कैलास तुपे सर यांनी मांडलेले विचार परीक्षकांना प्रभावित करण्यात यशस्वी झाले. जग बदलणारा बाप माणूस या पुस्तकाचे प्रसिद्ध लेखक जगदीश ओहोळ, नालंदा





फाउंडेशनचे अध्यक्ष प्रदीप रोडे सर, उपायुक्त सोनवणे साहेब व इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये १० नोव्हेंबर रोजी तुलसी आय.टी.आय. कॉलेज बीड येथे पारितोषिक वितरण सोहळा थाटामाटात पार पडला. कैलास तुपे हे प्राथमिक शिक्षक म्हणून जि.प.के. प्रा. शा. जाटनांदूर ता. शिरूर कासार येथे सध्या कार्यरत आहेत. शैक्षणिक क्षेत्रात गुणवंत विद्यार्थी घडवण्याबरोबरच ते उपक्रमशील शिक्षक म्हणून बीड जिल्ह्यात ओळखले जातात. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी प्रभावी व्याख्याने ते देतात. उत्कृष्ट सूत्रसंचालक म्हणूनही त्यांनी नावलौकिक मिळवलेला आहे. विद्यार्थ्यांमध्ये हे गुण उतरवण्यासाठी ते नेहमी धडपडत असतात. आत्तापर्यंत त्यांना अनेक राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. अत्यंत मानाची असणारी ही नालंदा फाउंडेशन ची राज्यस्तरीय शिक्षक वक्तृत्व स्पर्धेत त्यांनी विजय प्राप्त करत शिरूर तालुक्याचा गुणगौरव वाढवल्याने सर्व क्षेत्रातून त्यांचे कौतुक होत आहे.

# देवगावमध्ये बिबट्याचा धुमाकूळ
# संतप्त ग्रामस्थ व विद्यार्थ्यांचा रस्ता रोको!

### "बिबट्याला ठार करा!" - प्रशासनाविरोधात घोषणाबाजी, ग्रामस्थांचा संताप उसळला

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे :** निफाड तालुक्यातील देवगाव परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याच्या सततच्या वावरामुळे ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याच निषेधार्थ आज सकाळी ग्रामस्थ व विद्यार्थ्यांनी निफाड–लासलगाव मार्गावर जाहीर संतप्त रस्ता रोको आंदोलन छेडले.

बुधवार दि. १२ रोजी सकाळच्या सुमारास जेरबंद केलेल्या "बिबट्याला ठार करा! नाहीतर शाळा बंद!" अशा घोषणा देत शेकडो विद्यार्थी, महिला व ग्रामस्थ रस्त्यावर उतरले. अचानक झालेल्या या आंदोलनामुळे वाहतूक काही काळ ठप्प



झाली होती.

गेल्या काही दिवसांपासून परिसरात बिबट्याचे वारंवार दर्शन होत असून, रात्रीच नव्हे तर दिवसाढवळ्या देखील बिबट्या गावाच्या हद्दीत फिरताना दिसत असल्याने नागरिक भयभीत झाले आहेत. विशेषतः शाळा–कॉलेजमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

ग्रामस्थांचा आरोप आहे की, वनविभागाकडे अनेकदा तक्रारी करूनही काहीच ठोस कारवाई करण्यात आलेली नव्हती. "फक्त पिंजरा लावल्याचे सांगण्यात येते होते, पण खूप दिवसानंतर आज बिबट्याला पकडण्यात यश आले आहे,"

रस्ता रोकोदरम्यान ग्रामस्थांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की, "पकडलेल्या बिबट्याला ठार करा, अन्यथा मोठे आंदोलन उभे करू. आमच्या मुलांच्या जीवाशी खेळ सहन केला जाणार नाही!"

आंदोलनाची माहिती मिळताच पोलीस व वनविभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, "परिसरात तीन ठिकाणी पिंजरे लावण्यात आले असून अजून काही बिबट्याचा शोध सुरु आहे."

मात्र, ग्रामस्थांचा संताप ओसरण्याचं नाव घेत नव्हता, त्यांनी प्रशासनाकडून तात्काळ ठोस पावले उचलण्याची मागणी केली आहे.

या घटनेमुळे देवगाव परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, बिबट्याच्या वाढत्या हालचालीमुळे ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये पुन्हा एकदा भीतीचे सावट पसरले आहे.

## श्रीवर्धन संशयास्पद 'ट्रॅफिक पोलिस' लिंकवरून हॅकिंगचा धोका; भूमिपुत्र संघटनेची पोलिसांकडे तक्रार

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित :** श्रीवर्धन शहरात कालपासून एका संशयास्पद 'ट्रॅफिक पोलिस चालान' या नावाने व्हॉट्सॲपवर लिंक फिरत असून ती उघडल्यावर मोबाईल क्रमांक व व्हॉट्सॲप अकाऊंट हॅक होत असल्याचा प्रकार समोर आला आहे. या माध्यमातून आर्थिक व वैयक्तिक नुकसान होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. या संदर्भात भूमिपुत्र संघटना, श्रीवर्धन यांनी पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली असून ऑनलाइन सायबर सेलकडेही नोंद घेण्यात आली आहे.

या लिंकमुळे अनेक युवकांचे व्हॉट्सॲप अकाऊंट हॅक झाल्याची प्रकरणे स्थानिक पातळीवर दिसून आली आहेत. संबंधित लिंक 'ट्रॅफिक पोलिस'च्या नावाने असल्यामुळे



अनेकांनी ती अधिकृत समजून उघडली, परंतु ती हॅकर्सकडून तयार करण्यात आल्याचे लक्षात येताच नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

भूमिपुत्र संघटनेच्या प्रतिनिधींनी श्रीवर्धन पोलिसांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, "या प्रकारामागे कोणते गट कार्यरत आहेत, याचा सखोल तपास करून दोषींवर कठोर कारवाई करावी. तसेच नागरिकांना त्वरित सतर्कतेचा इशारा देण्यात यावा."

सदर तक्रारीची नोंद घेत पोलिसांनी तपास सुरू केल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान, सायबर तज्ज्ञांनी नागरिकांना कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक न करण्याचे, व्हॉट्सॲपवर आलेले ओटीपी किंवा वैयक्तिक माहिती कोणाशीही शेअर न करण्याचे आवाहन केले आहे.

पोलिसांकडूनही नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, "जर अशा संशयास्पद लिंक प्राप्त झाल्या असतील तर त्या त्वरित डिलीट कराव्यात आणि संबंधित माहिती पोलिस ठाण्यात द्यावी.श्रीवर्धनमध्ये अशा प्रकारचा सायबर फसवणुकीचा प्रकार प्रथमच समोर आल्याने नागरिकांमध्ये सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## आदिवासी आश्रमशाळा मरसुळ च्या संचिताला राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत कांस्यपदक; तालुक्यातून संचिताचे व शिक्षकांचे कौतुक

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी / राजु गायकवाड :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे; जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा (सन २०२५-२६) नुकतीच खोपोली, जि. रायगड येथे ६ ते ८ नोव्हेंबर २०२५ दरम्यान पार पडली.या स्पर्धेत महात्मा मुंगसाजी आदिवासी शिक्षण संस्था, पुसद द्वारा संचलित स्व. नामदेवरावजी मळघणे आदिवासी कनिष्ठ महाविद्यालय आश्रम शाळा, मरसूळ ता. पुसद, जि.




यवतमाळ येथील इ. ११ वी कला शाखेची विद्यार्थिनी कु. संचिता राठोड हिने १७ वर्षे मुलींच्या फ्रीस्टाईल कुस्ती प्रकारात (४६ कि. ग्रा. गट) उत्कृष्ट कामगिरी करून कांस्यपदक पटकावले.

संचिताने या स्पर्धेत मुंबई विभागातील प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करत तिसरा क्रमांक मिळविला. या यशामागे तिचे प्रशिक्षक जय बजरंग व्यायामशाळा, फुलवाडी येथील श्री. विश्वास चव्हाण, ईशान चव्हाण आणि मिथुन चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच संचिताच्या वडिलांचे श्री. रविंद्र राठोड, शाळेचे क्रीडा शिक्षक श्री. वाय. आय. परसुवाले व मुख्याध्यापक श्री. ए. जी. सय्यद यांनी स्पर्धेपूर्वी तिला मार्गदर्शन केले.

शाळेच्या निरंतर शैक्षणिक व क्रीडा प्रगतीसाठी संस्थेचे आधारस्तंभ माजी मंत्री ॲड. शिवाजी राव मोघे यांनी समाधान व्यक्त केले व कु. संचिता हिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पुसद चे प्रकल्प अधिकारी श्री. अमोल मेतकर, संस्थेचे अध्यक्ष श्री. जितेंद्र मोघे, उपाध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर तडसे, शाळेचे युवा संचालक लीलाधर मळघणे सर, प्राचार्य ए. जी. सय्यद व सर्व शिक्षक-कर्मचाऱ्यांनी तिचे कौतुक करून अभिनंदन केले.

## भव्यदिव्य दृक् श्राव्यातून राष्ट्रसंतांना अभिवादन - विनोद देशमुख

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर**
केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आयोजित, वर्षागणिक वाढतच चाललेल्या आणि गर्दीचा विक्रम नोंदविणाऱ्या नागपूर खासदार सांस्कृतिक महोत्सवाचा कालचा रविवार विलक्षण भारावलेला होता.

पत्थर सारे बॉम्ब बनेंगे भक्त बनेगी सेनाझाडझडुले शस्त्र बनेंगे नाव लगेगी किनारेया आणि अशाच धगधगत्या गीतांमधून ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र क्रांतीची ज्योत जनमानसाच्या मनात पेटविणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा जीवनपट उलगडून त्यांना श्रद्धांजली वाहणारा अनोखा लाईट ॲंड साऊंड शो... राष्ट्रसंतांची जीवनगाथा !

दोनचारशे नव्हे, तब्बल तेराशे कलावंत (गायक, वादक, नर्तक, तंत्रज्ञ मिळून) दोन तास सांगत होते राष्ट्रसंतांचा विलक्षण जीवनप्रवास... त्यांचे काव्य, त्यांचे संगीत, त्यांचे उपदेश, धर्म आणि देशासाठी त्यांची धडपड... आधुनिक "लाईट ॲंड साऊंड शो" चा सदरा घातलेली एक अतिभव्य संगीतिका, असेच




याचे वर्णन करावे लागेल.तबला, ढोलक, खंजिरी, टाळ, इतर वाद्ये अनेक जण एका तालासुरात वाजवत आहेत, अनेकानेक गायक-गायिका समूहगानात मग्न आहेत, नर्तकांचा व्यासपीठावर सामूहिक पदन्यास सुरू आहे, मागच्या भव्य पडद्यावर राष्ट्रसंतांसंबंधीचे कृष्णधवल व्हिडिओ/चित्र भरभर पुढे सरकताहेत... हे सारे दृश्यच डोळ्यात आणि कानात साठवून घेण्यासारखे आहे. एकावेळी शेकडो लोक व्यासपीठावर उपस्थित असणे, हा नवीन विक्रम या प्रयोगाने नक्कीच नोंदविला असणार. याचा अनुभव प्रत्यक्ष घेण्यासाठी हा 'महाप्रयोग' प्रत्येकाने एकदातरी पाहावाच.

भजन हा तर महाराजांचा जीव की प्राण होता. स्वत: खंजिरी वाजवत खड्या आवाजात ते गाण्यांमधून समाजप्रबोधन करायचे, वाईट प्रथांवर आसूड ओढायचे, कानपिचक्या द्यायचे, देशभक्तीचा डोज पाजायचे. पण, इतरही काव्य/गान प्रकार त्यांनी हाताळले. भारूड काय, पोवाडा काय, अगदी कव्वाली सुद्धा !

**जब किसानोंकी देखू भलाई**
**हो, मैने खुशियां मनाई**

ही कव्वाली आजच्या परिस्थितीत सुद्धा लागू पडते, इतकी दूरदृष्टी महाराजांना लाभली होती. मनी नाही भाव म्हणे देवा मला पाव, या भारतात बंधुभाव नित्य वसू दे, माणूस द्या मज माणूस द्या आदी चिरतरुण गीते मोठ्या समूहाकडून ऐकताना प्रेक्षक/श्रोते तृप्त झालेले दिसत होते.

"चला हो पंढरीला जाऊ, जिवाच्या जिवलगा पाहू" या वारीगीतावरील दींडीनृत्याने प्रारंभीच पकड घेतलेला हा कार्यक्रम चढत्या भाजणीने खुलत गेला आणि महाराजांच्या निर्वाणदृश्याच्या शोकांतिकेने संपला. जन्मापासून मृत्यूपर्यंत राष्ट्रसंतांच्या विलक्षण प्रवासाचा अत्यंत प्रभावी चालताबोलता आढावा. काही गीतांमध्ये स्वत: "तुकडोजी महाराज" खंजिरी वाजवत गाताना पाहून उपस्थित सारेच सुखावले !

सामूहिक वादन, गायन, नृत्य यांचे कठीण असे एकत्रित सादरीकरण नीटनेटके होते.

यासाठी संगीत संयोजक श्रीकांत पिसे आणि नृत्य दिग्दर्शक अक्षय धबडगावकर यांचे कौतुकच करायला हवे. देवेन्द्र दोडके यांचे सूत्रसंचालनही प्रवाही. निर्माते डॉ. देवेन्द्र यादव यांना एका आगळ्यावेगळ्या उपक्रमाबद्दल अनेक धन्यवाद. जय गुरुदेव

## मरळगोई परिसरात बिबट्याचा थरार! योगेश दरेकर यांच्यावर झेप घेण्याचा प्रयत्न - सुदैवाने बचावला

### द्राक्षबागेतून परतताना बिबट्याने झेप घेतल्याने क्षणभर भीतीचे वातावरण

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे :** निफाड तालुक्यातील मरळगोई बुद्रुक गावात मंगळवारी संध्याकाळी बिबट्याच्या उपस्थितीमुळे एकच खळबळ उडाली. ग्रामस्थ योगेश पांडुरंग दरेकर हे आपल्या द्राक्षबागेची फवारणी करून घरी परतत असताना अचानक झुडपातून बिबट्याने झेप घेत हल्ला करण्याचा प्रयत्न केला.

अचानक घडलेल्या या प्रसंगाने दरेकर क्षणभर गोंधळले, मात्र त्यांनी तत्परतेने जागा बदलत स्वतःचा जीव वाचविला.

या हल्ल्यात त्यांना कोणतीही शारीरिक इजा झाली नाही, परंतु घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

घटनेनंतर ग्रामस्थांनी तत्काळ वनविभागाला माहिती दिली. बिबट्याच्या हालचालींना आळा घालण्यासाठी पिंजरा लावण्याची तयारी वनविभागाने सुरू केली आहे.

गावात या घटनेची जोरदार चर्चा असून, शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

विशेषतः संध्याकाळीनंतर बाहेर जाण्यास नागरिकांनी टाळावे, तसेच लहान मुलांवर लक्ष



> **"गावाजवळ बिबट्याच्या हालचाली वाढल्यामुळे आम्ही अत्यंत भयभीत झालो आहोत. वनविभागाने पिंजरा लावून लवकर कारवाई करावी," अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.**

ठेवावे, असा सल्ला वनविभागाकडून देण्यात आला आहे.

अलीकडच्या काळात निफाड तालुक्यातील विविध भागात बिबट्यांच्या हालचाली वाढल्याचे वारंवार दिसून येत आहे. त्यामुळे वनविभागाने सतर्कता वाढवावी व नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.

## पनवेल येथील महात्मा फुले महाविद्यालयाच्या पार्थ मानेची मुंबई विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत गगनभरारी

### १० मीटर एअर रायफल प्रकारात पटकाविले सुवर्णपदक

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर :** पनवेल येथील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात विज्ञान शाखेत शिकत असलेल्या पार्थ राकेश माने याने नुकत्याच मुंबई विद्यापीठ आयोजित मुंबई झोन क्र. १ च्या एथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत १० मीटर एअर रायफल प्रकारात सुवर्णपदकाला गवसणी घातली आहे.

मुंबई विद्यापीठाच्या क्रीडा विभागाकडून दरवर्षी या क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जाते. मुंबई विद्यापीठ क्षेत्रातील अनेक मातब्बर खेळाडूंशी टक्कर देत महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करताना पार्थने वयाच्या १८ व्या वर्षी मिळविलेले हे यश सर्व युवकांना प्रेरणा देणारे आहे.



त्याच्या या उज्ज्वल यशामुळे पनवेल महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

पार्थच्या या सुवर्ण कामगिरीबद्दल प्रतिक्रिया देताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर म्हणाले की, पार्थ माने हा विद्यार्थी म्हणजे आमच्या महाविद्यालयाचे भूषण आहे. त्याच्या जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्याने लहान वयातच खूप मोठ्या यशाला गवसणी घातली आहे. त्याचे रायफल शुटींगमधील कौशल्य थक्क करणारे आहे. आपल्या कामगिरीत त्याने असेच सातत्य ठेवले तर तो देशासाठी ऑलिंपिकमध्येही सुवर्णपदक जिंकू शकेल, याची मला खात्री आहे. या आनंदाच्या प्रसंगी त्यांनी पार्थ मानेचे व त्याच्या कुटुंबियांचे विशेष अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी त्याला शुभेच्छा दिल्या.

पार्थ माने याच्या या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन मा. चंद्रकांत दळवी, सचिव मा. विकास देशमुख, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन मा. रामशेठ ठाकूर, रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागीय सल्लागार समितीचे चेअरमन मा. बाळाराम पाटील, मा. जे. एम. म्हात्रे, मा. महेंद्रशेठ घरत, मा. अरुणशेठ भगत, महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष मा. परेशशेठ ठाकूर तसेच शिवछत्रपती पुरस्कार विजेते श्री. सूर्यकांत ठाकूर व श्री. संजय कडू आदी मान्यवरांनी विशेष कौतुक केले. यासोबतच समाजाच्या विविध स्तरांतून विद्यार्थ्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## अंध महिलांच्या क्रिकेटला इंडसइंड बँकेचे पाठबळ - भारताच्या टी-२० महिला विश्वचषक संघाला पाठिंबा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी) :** भारतीय क्रीडा क्षेत्रात एक ऐतिहासिक क्षण आलेला आहे. जगातील पहिल्यावहिल्या महिला अंध टी-२० विश्वचषकात सहभागी होण्यासाठी भारतीय अंध महिला क्रिकेट संघ सज्ज झाला आहे. भारत आणि श्रीलंका यांच्या संयुक्त विद्यमाने ११ ते २३ नोव्हेंबर २०२५ दरम्यान या स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

समर्थनम ट्रस्ट फॉर द डिसेबल्डची क्रिकेट शाखा आणि उपक्रम असलेल्या क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड इन इंडियाच्या सहकार्याने इंडसइंड बँक त्यांच्या सीएसआर उपक्रमाद्वारे भारतीय संघाला पाठिंबा देते. विविधता, सर्वसमावेशकता आणि खेळाच्या परिवर्तनीय शक्तीसाठी बँकेची अढळ वचनबद्धता हे सहकार्य अधोरेखित करते. या स्पर्धेत ऑस्ट्रेलिया, भारत, नेपाळ, पाकिस्तान, श्रीलंका आणि अमेरिका या सात देशांचा समावेश असेल. नवी दिल्ली, बेंगळुरू आणि कोलंबो येथे हे सामने होणार आहेत.

| अंध महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी १६ सदस्यीय भारतीय संघ | |
|---|---|
| काव्या एन.आर | जमुना रानी तुडू |
| करूणा कुमारी | गंगा कदम |
| काव्या व्ही | पार्वती मार्नदी |
| फुला सारेन | सिमरनजीत कौर |
| सिमू दास | सुनीता सारथे |
| अनेखा देवी | सुषमा पटेल |
| अनु कुमारी | बसंती हंसदा |
| दुर्गा येवले | दीपिका टी.सी |

बँकेच्या सहकार्याबद्दल इंडसइंड बँकेचे कॉर्पोरेट, कमर्शियल आणि ग्रामीण बँकिंग प्रमुख संजीव आनंद म्हणाले की, अंधांसाठीच्या जगातील पहिल्या टी-२० विश्वचषक स्पर्धेची तयारी करत असलेल्या भारतीय अंध महिला क्रिकेट संघाला पाठिंबा देण्याचा आम्हाला अभिमान आहे. इंडसइंड बँकेत आम्ही सर्वसामावेशकतेला सर्वाधिक महत्त्व देतो. ते आमचे एक व्यावसायिक मूल्य आहे. सीएबीआयसोबतची आमची दीर्घकालीन भागीदारी ही समान संधी निर्माण करण्याची आणि अडथळयांच्या पलीकडे जाऊन कौशल्याचा उत्सव साजरा करण्याची आमची वचनबद्धता दर्शवते. हे खेळाडू त्यांचे कौशल्य आणि दृढनिश्चयाने आम्हाला प्रेरणा देतात. तसेच जागतिक स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करताना त्यांच्यासोबत उभे राहण्याचा आम्हाला सन्मान वाटतो."

या भागीदारी बद्दल क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड इन इंडियाच्याचे अध्यक्ष डॉ. महांतेश जी. किवदासन्नावर म्हणाले की, "सीएबीआय आणि संपूर्ण देशासाठी हा खरोखरच अभिमानाचा क्षण आहे. हा टप्पा गाठण्यासाठी आमच्या महिला संघाने अतुलनीय धैर्य, चिकाटी आणि उत्कृष्टतेचे उदाहरण दिले आहे. त्यांच्या कामगिरीतून दिव्यांगांच्या क्रिकेटची वाढती ताकद आणि सर्वसमावेशकता दिसून येते. दृष्टिहीन खेळाडूंना सक्षम बनवण्याच्या आमच्या ध्येयाला भक्कम पाठबळ देण्यासाठी आम्ही इंडसइंड बँकेचे मनापासून आभारी आहोत. या गुणी महिलांना त्यांची स्वप्ने पूर्ण करण्यात आणि खेळाच्या माध्यमातून देशाला सन्मान मिळवून देण्याचा त्यांचा उदात्त हेतू पूर्ण करण्यात बँकेच्या सहकार्याने महत्त्वाची भूमिका बजावली आहे."

# निफाड तहसील कार्यालयात राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे आंदोलन

## विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना सादर

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

**निफाड :** राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या वतीने विविध प्रलंबित मागण्यांसाठी मंगळवारी (दि. ११ नोव्हेंबर) निफाड तहसील कार्यालयावर भोजनाच्या सुट्टीत निदर्शने करण्यात आली. यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदार विशाल नाईकवाडे यांना मागण्यांचे निवेदन सादर केले.

या निदर्शनात नाशिक जिल्हा उपाध्यक्ष जयंत लिलके, निफाड तालुका अध्यक्ष शरद घाटगे, उपाध्यक्ष विजय चव्हाण, सरचिटणीस प्रशांत पवार, शंकर खंडागळे, जितेंद्र भोसले, महिला प्रतिनिधी अकिला तडवी, वैशाली हिंडे, रोशनी पटेल, माधुरी आहिरे, मोहिनी कुलथे, माणिक गाडे, फोकने, कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

निवेदनात संघटनेने विविध महत्त्वाच्या मागण्या मांडल्या. त्यामध्ये सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची अंमलबजावणीबाबत तत्काळ अधिसूचना जारी करणे, १० वर्षे सतत सेवा बजावणाऱ्या कंत्राटी, रोजंदारी व अंशकालीन कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण,



प्रतिक्षा यादीतील पात्र उमेदवारांना अनुकंपा तत्वावर नियुक्त्या देणे, सरकारी व निमसरकारी कर्मचारी तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करणे, चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहनचालक भरतीवरील बंदी उठविणे यांचा समावेश आहे.

तसेच १ नोव्हेंबर २००५ पूर्वी विना अनुदान, अंशतः अनुदानित तसेच २००५ नंतर पूर्ण अनुदानावर आलेल्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी करण्यात आली. त्याचबरोबर १०, २०, ३० वर्षांच्या सेवेनंतर मिळणाऱ्या आश्वासित प्रगती योजनेचा लाभ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करण्यात यावा, नगरपरिषदा आणि नगरपंचायतींचा सन २००५ पासूनचा आकृतीबंध तयार करण्यात यावा आणि पूर्वाश्रमीच्या ग्रामपंचायतींमधील कायम कर्मचाऱ्यांचे नियमित समावेशन करण्यात यावे, अशा विविध मागण्या निवेदनात नमूद करण्यात आल्या.या आंदोलनाद्वारे संघटनेने शासनाचे लक्ष कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे वेधले असून, मागण्या तत्काळ मान्य न झाल्यास पुढील तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# दीड तासांचे शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण; ऑपरेशन मंगळसूत्र यशस्वी

**दैनिक युवक आधार**

**कर्जत प्रतिनिधी** : ता.१० गाईच्या पोटात प्लास्टिक, खिळे किंवा लोखंडी तुकडे सापडल्याचे आपण ऐकतो. पण चक्क सोन्याचे मंगळसूत्र गाईच्या पोटात गेले, हे ऐकून कोणाचाही विश्वास बसणार नाही. पण गुरवपिंप्री येथील शेतकरी दत्तात्रेय टकले यांच्या घरी हा रोमांचक प्रसंग घडला. खुराकाच्या गोणीत ठेवलेले मंगळसूत्र नकळत गाईच्या पोटात गेले. हे मंगळसूत्र मिरजगाव येथील पशुधन विकास

अधिकारी डॉ. संतोष गवारे यांनी बाहेर काढत 'ऑपरेशन मंगळसूत्र' यशस्वी केले.रविवारी (ता. ९) टकले यांच्या कुटुंबाला कार्यक्रमासाठी बाहेर जायचे होते. घाईगडबडीत घरातील मंगलसूत्र सुरक्षित राहावे, म्हणून खुराकाच्या गोणीत ठेवले. घरी असलेल्या वडीलधाऱ्यांनी खुराक दोन गाईंना चारला. काही वेळाने महिलांनी हार शोधायला सुरुवात केली, पण तो खुराकाच्या गोणीत नव्हता. घरात एकच तारांबळ उडाली. कुटुंबाने तर्क लावला की, गाईंना चारलेल्या खुराकातूनच हार गाईच्या पोटात गेला असावा.

गुरवपिंप्री (ता. कर्जत): शस्त्रक्रियेनंतर टकले कुटुंबियांना सोन्याचे मंगळसूत्र परत करताना पशुधन अधिकारी डॉ. संतोष शिवाजी



गवारे.दोन्ही गाईपैकी सोन्याचे मंगळसूत्र नेमका कोणत्या गाईच्या पोटात गेलेआहे, याबद्दल सांशकता कुटुंबीयांमध्ये होती. टकले यांनी पशुधन पर्यवेक्षक

आकाश सूर्यवंशी यांच्याशी संपर्क साधला. सूर्यवंशी यांनी मिरजगाव येथील पशुवैद्यकीय शल्यचिकित्सक डॉ. संतोष गवारे यांना माहिती दिली. गवारे यांनी मेटल डिटेक्टर घेऊन गुरवपिंप्री गाठले. तपासणी करून मंगळसूत्र नेमके कोणत्या गाईच्या पोटात आहे, हे अचूक निदान केले. डॉक्टरांनी तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय

> “ जनावरांना कुट्टी मशीनद्वारे चारा भरवताना नट-बोल्ट्स किंवा धारदार पत्र्याचे तुकडे आहारात जाणार नाहीत याची दक्षता घ्या. पशुखाद्य (खुराक) भिजवल्यावर, त्यात नकळत गेलेले धातूचे लहान कण बाहेर काढण्यासाठी चुंबक फिरवण्याची सवय लावा. यामुळे जनावरांचे आरोग्य आणि जीव सुरक्षित राहील.
>
> डॉ. संतोष गवारे

> “ अनावधानाने घडलेल्या या प्रकारामुळे सुरुवातीला संपूर्ण कुटुंब घाबरून गेले होते. परंतु डॉक्टरांच्या तत्परतेमुळे मोठी हानी टळली. शस्त्रक्रियेनंतर गाय देखील सुखरूप आहे.
>
> - दत्तात्रेय टकले, पशुपालक

घेतला. दीड तास चाललेल्या नाजूक ऑपरेशनमध्ये गवारे आणि पथकाने गाईच्या पोटातील मंगळसूत्र यशस्वीरित्या काढले. तेव्हा टकले कुटुंबातील महिलांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहण्यासारखा होता. मौल्यवान दागिना मिळाला, पण त्याहून महत्त्वाचे लाडक्या गाईचा जीवही सुरक्षित राहिला.

# उरणकडे जाणाऱ्या लोकल रेल्वे चा खारकोपर येथे खोळंबा प्रवासी संतप्त

**दैनिक युवक आधार**

**उरण प्रतिनिधी :** आज बुधवार दिनांक 12 नोव्हेंबर 2025 रोजी नेहमीप्रमाणे 11: 40 ची नेरूळ हून उरण कडे धावणारी लोकल खारकोपर स्टेशनला थांबली थांबण्याच्या नियोजित वेळेनंतर सुद्धा स्टेशन सोडेना तेव्हा हळूहळू प्रवाशांनी प्लॅटफॉर्मवर उतरायला सुरुवात करून मोटरमनच्या केबिन कडे धाव घेतली आणि त्यांना प्रश्नांची सरबत्ती सुरू केली . प्रवाशांच्या संतप्त प्रश्नांवर मोटरमनला काही समाधानकारक उत्तर देता येत नसल्यामुळे त्यांनी गार्डला बोलावून घेतले. रेल्वे प्रशासनाच्या कंट्रोल रूम कडे विचारणा करून मोटरमनने न्हावा येथील गॅस गळती झाल्यामुळे ही लोकल आज पुढे जाऊ



शकणार नाही. आणि ही ट्रेन पुन्हा नेरूळकडे रवाना होईल असे सांगण्यात आले. आपल्या दैनंदिन कामांमध्ये आजच्या प्रवासामुळे खोळंबा होऊन प्रवाशांचे पुढील वेळापत्रकामध्ये विलंब झाला कार्यक्रम लेट झाले. तथापि संतप्त प्रवाशांनी रेल्वे प्रशासनावर नाराजी व्यक्त करीत आपापला प्रवास रस्त्यावर जाऊन सुरू केला.

रेल्वे प्रशासनाने गॅस गळती मुळे पुढील होणारा धोका टाळण्यासाठीच हे पाऊल उचलले असल्याचे सांगितले गॅस गळतीची अडचण दूर झाल्यावर लोकल नेहमीप्रमाणे आपल्या निर्धारित वेळेवर धावेल.

# मुदखेड परिसरात भीषण अपघात; बेकायदेशीर वाळू टिपरने स्कूल बसला दिली जोरदार धडक, ४० विद्यार्थ्यांचा थरकाप उडाला!

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी योगेश चौदंते मुदखेड.**

आज सकाळी मुदखेड शहराजवळ घडलेल्या भीषण अपघाताने परिसर हादरला आहे. बेकायदेशीर वाळू वाहतूक करणाऱ्या MH-26 AD 1168 या टिपरने MH-26 DD 0105 क्रमांकाच्या शाळेच्या बसला जोरदार धडक दिली. या बसमध्ये सुमारे ४० विद्यार्थी प्रवास करत होते. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

अपघात होताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि विद्यार्थ्यांना सुरक्षित बाहेर काढले. बसच्या पुढील भागाचे मोठे नुकसान झाले असून, टिपर चालक अपघातानंतर पसार झाल्याची माहिती मिळाली आहे.

या घटनेनंतर नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. बेकायदेशीर वाळू वाहतूक थांबविण्यास प्रशासन अपयशी ठरत असल्याबद्दल जनतेत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. “अवैध




वाळू टिपर जोमात... प्रशासन कोमात!” अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. स्थानिकांनी या घटनेची गंभीर दखल घेऊन संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.बेकायदेशीर वाळू टिपरने शाळेच्या बसला दिली धडक ४० विद्यार्थी बालबाल बचावले, मोठी दुर्घटना टळली. प्रशासनाच्या दुर्लक्षावर नागरिक संतप्त दोषींवर कठोर कारवाईची मागणी प्रशासनाने तातडीने कारवाई करून अवैध वाळू वाहतूक रोखावी, अशी सर्वसामान्य नागरिकांची मागणी आहे.

# म्हाडा इमारतीचा पुनर्विकास बैठक संपन्न



**दैनिक युवक आधार**

**सहसंपादक मुकुंद कांबळे :** मुंबईतील म्हाडा च्या इमारतींचा पुनर्विकास केला जात आहे. म्हाडा इमारतींचा अडचणी आणि इतर विविध विषयांवर रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी म्हाडा च्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली.यावेळी स्वयंपूर्णविकास प्राधिकरणाचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर आणि म्हाडा चे अनेक अधिकारी उपस्थित होते.

ज्या म्हाडा इमारती समाज कल्याण विभागाच्या अनुदान अंतर्गत आलेल्या आहेत त्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी समाज कल्याण मंत्रालयाच्या एन ओ सी चा विषय प्रलंबित आहे. या सर्व 28 म्हाडा इमारतींचा स्वयंपूर्विकास करण्याबाबतचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.यावेळी रिपब्लिकन पक्षाचे मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे; जिल्हा अध्यक्ष रमेश गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

# तुमचं एक मत ठरवू शकत तुमचं उद्याचं भविष्य म्हणून विचार करा पक्का योग्य उमेदवारला मारा शिक्का

**दैनिक युवक आधार**

**किनवट प्रतिनिधी विशाल भालेराव**

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकां जाहीर होताच गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या कार्यकर्ते जोरात कामाला लागले आहेत त्यांना शेजारीही ओळखत नाहीत असे ही थेट जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सभापती पदांचे स्वप्न पाहताना दिसत आहेत तर समाज माध्यमांमध्ये व्हायरल होण्यासाठी व्हाट्सअप व फेसबुक कार्यकर्ते जमा केले जातात यामुळे नागरीकांचे मनोरंजन होत आहे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकां जाहीर होण्या अगोदर बराच स्वंयघोषित नेत्यांनी आपणच कसे योग्य आहोत म्हणत स्वताची पाठ थोपटून घेयाला सुरुवात केली आहे समोरच्या गलीतुन माणूस गेला तरी त्यांच्या कडे न बघण्यासारखे करणारे जनतेतून जिल्हा परिषद सदस्य भावी सभापती होण्याची स्वप्ने पाहु लागल्याने नागरीकांमध्ये आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

जो उमेदवार निवडून येतो नंतर त्यांचं दर्शन होत नाही ग्रामीण भागातील समस्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे मात्र कुठलाही उमेदवार त्यांच्या कडे लक्ष देत नाही गावातील रस्ते, लाईट, आरोग्य विषयी समस्या या कुठलाही उमेदवार याकडे लक्ष देत नाही मात्र निवडणूक आली की त्यांना जनतेच्या समस्या दिसत आहेत यावेळी उमेदवार जो त्याच्या समस्या सोडवेल अशाच उमेदवाराला आम्ही मतदान करु असे मतदारांची चर्चा सुरू आहे कुठलाही पक्षाचा उमेदवार असो तो दलबदलू नसावा पक्ष बदलणारा नसावा हुशार प्रेमळ दिलखुलास अभ्यासु उमेदवार आम्ही निवडुन देउ अशीही चर्चा सुरू आहे.

# बेस्ट वाचवा,मुंबई वाचवा आंदोलनाला ज्येष्ठ नागरिकांचा पाठिंबा!

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (दत्ता खंदारे ) :** दि.१०नोव्हेंबर पासून बेस्ट वर्कर युनियनचे सरचिटणीस श्री शशांक राव यांनी बेस्ट प्रशासनाविरुद्ध बेमुदत आंदोलन उपोषण सुरू केले आहे. मुंबईतील कामगार वर्ग आणि बेस्ट सेवेतील त्रुटी संदर्भात मुंबईकरणा भेडसावणाऱ्या समस्यांवर आंदोलन सुरू केले आहे. त्यामध्ये जेष्ठ मंडळींना भेडसवणारे प्रश्न जसे की नवी मुंबई, ठाणे महापालिका या ठिकाणी जेष्ठांना मोफत बस प्रवास आहे. त्या धर्तीवर मुंबईतही बेस्ट प्रशासनाने जेष्ठांकरिता मोफत अथवा सवलचे दारात सुरू करावा तसेच मुंबई शहरातील नामशेष होत चाललेल्या बसेसची संख्या वाढवून त्या नियमित व वेळेवर सोडाव्यात आणि श्रमिक कामगारांचा रोजगार वाढावा या प्रमुख मागण्यांसाठी फेस्कॉम संलग्न हॅपिनेस ज्येष्ठ



नागरिक संघ व झेंडा ग्रुप धारावी यांच्या वतीने बेस्ट बचाव आंदोलनाला ज्येष्ठांचाही पाठिंबा अशा आशयाचे पत्र दिनांक 10 नोव्हेंबर रोजी आंदोलन करते, उपोषण करते श्री शशांक राव यांना संपर्कप्रमुख श्री दिलीप गाडेकर तसेच परशुराम जाधव, कचरू सदाफुले, किसन नारायणे, बबन गजरे, मंगेश व्हटकर व संदीप सोनवणे यांनी एका निवेदनाद्वारे प्रत्यक्ष भेटून चर्चा करून पाठिंबा दर्शवला आहे. कारण या आंदोलनामुळे बेस्ट वाचण्यास तसेच ज्येष्ठांचे प्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल असे आम्हाला वाटते.या निवेदनाची प्रत माननीय महाव्यवस्थापक बेस्ट प्रशासन व माननीय महापालिका आयुक्त यांनाही देण्यात येण्याची माहिती श्री दिलीप गाडेकर यांनी दिली.

# राज्यस्तरीय पुरस्कार चे मानकरी राजेश दामधर यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**वरूड सर्कल प्रतिनिधी ज्ञानेश्वर कुंडलिक निकाळजे**



जालना जिल्ह्यातील जाफ्राबाद तालुक्यातील भारज बु येथील रहिवाशी असलेले राजकीय , सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार श्रीमान राजेश दौलतराव दामधर यांची नागपुर येथील शासन मान्य मदत सामाजिक संस्थेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट पत्रकार पुरस्कारासाठी नुकतीच निवड केली आहे . हा पुरस्कार नागपुर येथे दि. १६/ ११ / २०२५ रोज रविवारला देण्यात येणार आहे मदत सामाजिक संस्थेतर्फे राज्यस्तरीय सामाजिक कार्यकर्ता संम्मेलन पुरस्कार वितरण सोहळा आयोजित केला आहे या संम्मेलनात हा पुरस्कार देण्यात येणार आहे श्री राजेश दामधर उच्चशिक्षित असून त्यांनी अनेक प्रशिक्षण घेतलेले आहे बालपणापासून सामाजिक कार्याची आवड असल्याने त्यांनी तालूका स्तरावर , जिल्हास्तरावर , गावपातळी वर अनेक राजकिय आणि सामाजिक पदे भुषविले आहे गेल्या तीस ते पस्तीस वर्षापासून ते पत्रकार आहेत त्यांच्या परिसरात झुंजार पत्रकार म्हणून त्यांनी ओळख निर्माण केलेली आहेत आणि पत्रकार संघटनेचे ते तालूका पदाधिकारी राहीलेले असून ते सध्या अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटनेचे जालना जिल्हा अध्यक्ष आहेत . त्यांनी पत्रकारीतेच्या माध्यमातुन सर्वसामान्य माणसाच्या समस्या , शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक वेळा लिखाण केलेले आहे त्यांनी त्यांच्या आर्टिकल मधून , कवितेमधून , बातमी मधून भावना व्यक्त केल्या आहेत त्यांचा राजकीय , सामाजिक आणि पत्रकारीतेचा प्रवास हा संघर्षमय , खडतर झालेला आहे त्यांच्या या कार्याची दखल घेऊन मदत या शासनमान्य संस्थेने घेतली असल्याने या पुरस्कारासाठी निवड केलेली आहे . राजेश दामधर हे अत्यंत गरिब परिस्थिती तुन शिक्षण आणि प्रशिक्षण घेतलेले असून त्यांना सर्वसामान्य माणसाच्या दुःखाची , वेदनेची , समस्येची , अडचणीची , अज्ञानाची, अंधश्रद्धेची चांगलीच जाणीव आहे त्यामुळे ते भरपूर क्षेत्रात चांगल्या पद्धतीने कार्य करू शकले यात तिळमात्र शंका नाही राजेश दामधर हे हा पुरस्कार स्वीकारण्या साठी नागपुर येथे जाणार असल्याचे बोलले जात आहे या पुरस्काराचे स्वरूप हे सन्मान चिन्ह , दुपट्टा , मानपत्र , पुष्पगुच्छ आणि भारताचे संविधान असे असणार आहे राजेश दामधर यांची या पुरस्कारासाठी निवड झाल्यामुळे भारज आणि परिसरामध्ये त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# वनविभागाने तुपटाकळी येथील माकडांचा बंदोबस्त करावा; वनपरीक्षेत्र अधीकारी दीग्रस यांना नागरीकानी दीले निवेदन

**दैनिक युवक आधार**

**उमेश साखरकर दिग्रस तालुका प्रतिनिधी** : तालुक्यातील तुपटाकळी गावात माकडांनी धुमाकूळ घातला आहे यातुन गावकऱ्यांची सुटका करावी यासाठी ५० नागरीकांच्या सह्याचे निवेदन वनपरीक्षेत्र अधीकारी राठोड साहेब दीग्रस यांना देण्यात आले यातील माकडे महीला व लहान मुलांवर हल्ला चढवीत आहे .यावर वनविभागाने तत्परतेने कारवाई करुन माकडांना पकडून सुरक्षित ठिकाणी



सोडण्यात यावे गावात दहशतीचे वातावरण पसरले आहे वनविभाग याकडे या दुर्लक्ष न करता लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यावी गावातील झाडांवर व घरांवर माकडांचे साम्राज्य सातत्याने वाढत असून १०० च्या वर माकडे आहेत . लहान मुले, महीला, वृद्ध घराबाहेर पडायला घाबरत आहेत कधी हल्ला करतील हे सांगता येत नाही कीतेक घरावरील टीन पत्रे माकडांच्या धुमाकूळाने चाळणी -चाळणी झाले आहेत पाच सहा वर्षांपासून यांचा गावात मुक्काम असल्याने माणसाला आता भीत नाहीत माकडांची दहशत इतकी वाढली की सरळ घरात शीरुन खाण्याच्या वस्तू लंपास करीत आहे अनेक वेळा माकडांनी लहान मुलांवर व महीलेवर हल्ला केला आहे वनविभागाने याची दखल घेऊन माकडाना पकडण्यासाठी त्वरित पुढाकार घेणे गरजेचे आहे अन्यथा माकडांच्या दहशतीत वावरणाऱ्याना जीवीतहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही माकडांना जंगलात पिटाळून लावावे आणि होणारा त्रास व हानी थांबवावी अशी मागणी तुपटाकळी येथील नागरीकानी निवेदनात नमूद केले आहे

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# प्रगत सिंधुदुर्ग मुंबई मंडळाची वार्षिक सभा मुंबई येथे संपन्न

## मंडळअध्यक्ष दयानंद चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या सभेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

प्रगत सिंधुदुर्ग मुंबई, या मंडळाची वार्षिक सभा, मंडळाचे अध्यक्ष दयानंद चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली, हेटकरी भंडारी मंडळ दादर पश्चिम येथे मान्यवरांच्या उपस्थितीत रविवारी घेण्यात आली.

सभेच्या सुरुवातीस संस्थेच्या माध्यमातून दयानंद चौधरी यांनी ज्या चाकरमान्यांची विविध कामे, मग ती जमिनीची असतील, वारस तपासाची असतील, शासकीय कार्यालयातून विविध दाखले मिळण्यासाठी येणाऱ्या अडचणी असतील,जात दाखला मिळण्याबाबत असेल,भाड्याने दिलेली घरे केअरटेकर यांनी आपल्या नावाने करून घेतलेली असतील, अशी विविध कामे मार्गी लावल्याबाबत, सुरेश पांचाळ, महादेव लाड, अनिल तांडेल, प्रमोद राणे,एड.आरती गवंडे, सुविधा गोवेकर, कादंबरी गवंडे, शैलेश धुरी, व इतर चाकरमान्यांनी त्यांच्या झालेल्या कामाबाबत आपले मनोगत व्यक्त केले व संस्थेचे आभार मानले.महाराष्ट्रातील प्रत्येक




जिल्ह्यामध्ये फिरून तरुणांना आय.ए.एस,/आय.पी.एस./ यू.पी. एस.सी. चे परीक्षेबाबत मोफत मार्गदर्शन करणारे सत्यवान रेडकर यांनी, प्रगत सिंधुदुर्ग या संस्थेच्या माध्यमातून मुंबईत असो वा सिंधुदुर्गमध्ये असो, अशा प्रकारची मार्गदर्शन शिबीरे घेतली जात असतील, तर त्याना मोफत मार्गदर्शन करण्याकरिता आपण केव्हाही तयार असल्याचं सांगितलं.जॉन्सन लिफ्ट कंपनीचे फायनान्स ऑफिसर सूर्यकांत बागवे,यांनी आपल्या भाषणात आय.टी.आय.पास, इलेक्ट्रिकल मेकॅनिकल डिप्लोमा धारक,जर तरुण असतील तर त्यांना आपल्या कंपनीमध्ये खात्रीने नोकरी देण्याकरीता आश्वासित केले.

संस्थेचे अध्यक्ष दयानंद चौधरी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात २०१६ रोजी या संस्थेची स्थापना झाल्यापासून आजपर्यंतच्या (९ नोव्हेंबर २०२५)कार्याचा आढावा घेतला, हा आढावा घेताना, काम करण्याकरिता सिंधुदुर्गच्या स्थानिक प्रशासनाकडून कशा प्रकारे अडचणी निर्माण केल्या जातात, व स्थानिक राजकीय पुढारी, लोकप्रतिनिधी, यांच्याकडूनही चाकरमान्यांच्या योग्य प्रकरणाला न्याय देताना कसा असहकार केला जातो, याची अनेक उदाहरणे दिली. शेवटी न्याय मिळविण्याकरिता कोकण आयुक्तांपर्यंत जावं लागतं, याकरिता प्रकरणांना न्याय देताना चार चार पाच पाच वर्षे वाट बघावी लागते. फक्त निवडणुकांच्या वेळी या लोकप्रतिनिधींना मुंबईच्या चाकरमान्यांची आठवण होते.

संस्थेच्या माध्यमातून सिंधुदुर्ग जिल्ह्यात केलेल्या अनेक सामाजिक उपक्रमांचा आढावा घेतला, त्यामध्ये शेतकरी मेळावे असतील, महिला बचतगट मिळावे असतील, वैद्यकीय शिबीरे असतील, वृद्धाश्रमांना केलेली मदत असेल, आदिवासी शाळांना केलेली मदत असेल, कोरोनाच्या काळात विविध शासकीय कार्यालयांना, संस्थेने स्वतः बनविलेल्या सॅनिटायझर मशीनस, सॅनिटायझर, सी विटामिन टॅबलेटस, नेब्युलायझर, कुडाळच्या महिला रुग्णालयास दिलेल्या पाच हजार फेरोवीन व्हिटेमीन्स टॅबलेटस, रुंगणांना केलेली आर्थिक मदत, सावंतवाडी तालुक्यातील कळणे, बांद्यातील शेरले, कुडाळमधील चेंदवण, वालावलं, सरंबळ, कुडाळ समता नगर, वैभववाडीतील उंबर्डे, व ईतर गावातील पूरग्रस्थांना,केलेली मदत. भविष्यातही संस्थेच्या माध्यमातून हे काम असेच अविरत चालू राहील याची ग्वाही चौधरी यांनी सभेस दिली.ही सामाजिक कामे करीत असताना संस्थेचा आर्थिक पाया मजबूत असावा लागतो. याकरिता मुंबईमध्ये एखादा कार्यक्रम घेऊन त्या माध्यमातून आर्थिक मदत जमा करण्याकरिता संस्था उपसचिव सतीश दळवी यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती स्थापना करण्यात आली.

सभेस घाडीगावकर समाजाचे अध्यक्ष मेघश्याम घाडीगावकर,एअर इंडिया लोकाधिकार समितीचे प्रशांत सावंत, हेटकरी भंडारी समाजाचे कार्यकारी मंडळ सदस्य भाई मांजरेकर, व अन्य मान्यवरानी मार्गदर्शन केले. सभेचे प्रास्ताविक संस्था उपसचिव सतेज दळवी यांनी केले तर आभार प्रदर्शन स्वतः अध्यक्ष दयानंद चौधरी यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता संतोष नाईक, सुरेश रंजन राऊळ,दिनकर परब, पांडुरंग गावडे, दीपक सरनोबत, महादेव लाड, देविदास सावंत, संभाजी मुणगेकर, अनिकेत रेवणकर, नंदकिशोर कांबळी, तुषार कांबळी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## प्रभाग क्र. ४ मधून नगरपरिषद निवडणुकीत प्रा. प्रियंका आकाश अंभुरे यांची दमदार उमेदवारी

**दैनिक युवक आधार**
**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार**

सेलू नगरपरिषद निवडणुकीच्या रणधुमाळीला आता अधिक रंग चढला असून, प्रभाग क्र. ४ मधून ओबीसी प्रवर्गातून प्राध्यापिका प्रियंका आकाश अंभुरे या प्रबळ दावेदार आहेत

प्रा. प्रियंका आकाश अंभुरे या सेलू नगरपरिषदेच्या माजी उपनगराध्यक्ष प्रा. लक्ष्मण धोंडीराम अंभुरे यांच्या सुन असून, शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या प्रा. प्रियंका आकाश अंभुरे यांनी



समाजकारणातही आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे.जनतेच्या सेवेसाठी तत्पर राहून प्रभागातील मूलभूत सुविधा, महिला सक्षमीकरण आणि युवकांसाठी रोजगारनिर्मिती या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करण्याची त्यांची भूमिका आहे.“जनतेसाठी, जनतेकडून, जनतेचं नेतृत्व” हा त्यांचा निवडणुकीचा प्रमुख घोषवाक्य असून, नागरिकांशी थेट संवाद साधून विकासाचा नवा अध्याय लिहिण्याचा त्यांचा निर्धार आहे.

स्थानिक पातळीवर प्रा. प्रियंका आकाश अंभुरे यांच्या उमेदवारीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, नागरिकांमध्ये आशा आणि अपेक्षेचे वातावरण निर्माण झाले आहे.त्यांचा शैक्षणिक दृष्टिकोन, पारदर्शक कार्यशैली आणि घराण्याची सामाजिक परंपरा लक्षात घेता या निवडणुकीत प्रभाग ४ मधील मुकाबला अधिक रंगतदार होणार असल्याचे चित्र आहे.

## खांदेश्वर पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्याच्या वागणुकीबद्दल तक्रार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** सद्रक्षणाय खलनिग्रहणाय" याचा अर्थ सज्जनांचे रक्षण करणे आणि दुर्जनांचा नायनाट करणे असा होतो . महाराष्ट्र पोलिसांचे हे महत्वाचे ब्रीदवाक्य सामन्य माणसांना सदैव सुरक्षित राहण्याची भावना निर्माण करत असतो. या संवेदनशील जवाबदारीत कर्तव्यदक्ष पोलीस सज्जन नागरिकांचे संरक्षण करण्यास आणि वाईट लोकांपासून (गुन्हेगारांपासून) त्यांचा बंदोबस्त करण्यास वचनबद्ध असतात. पण या ब्रीदवाक्याला गालबोट लागेल अशी काही घटना पनवेल तालुक्यातील माजी नगरसेवक संतोष हिरामण उरणकर यांनी निवेदन तक्रार अर्जात केली. संतोष उरणकर यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या कार्यपद्धतीचे कौतुक करून तेथील शिपाई सलीम तडवी अपवाद असल्याचे सांगत बेजबाबदारपणे कसलीही भीती न बाळगता ते पासपोर्ट चौकशीच्या कामात बेडरपणे पैशाची मागणी करत उद्धटपणे वागत नागरिकांना त्रास देतात असे उल्लेखले गेले आहे. या गंभीर घटनेची तक्रार त्यांनी माननीय पोलीस आयुक्त तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक खांदेश्वर यांच्याकडे अर्जाद्वारे केली असून शिपाई सलीम तडवी यांची या विषयी चौकशी लावण्यात यावी तसेच त्यांची बदली करण्यात यावी अशी मागणी केली आहे . या तक्रारीमुळे पोलीस प्रशासन व सामन्य नागरिकांमधील अविश्वास व तणावाचा प्रश्न ऐरणीवर येत आहे. या गंभीर विषया प्रकरणी वरिष्ठ पोलीस अधिकारी कशा पद्धतीने कारवाई करून नागरिकांच्या अडचणीचे समाधान करतील याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. सलीम तडवी हे पैसे दिले कि खुश असतात नाहीतर गरिबांचे काम असले कि त्यांच्याशी अरेरावीने बोलणे करत असल्याच्या अनेक नागरिकांच्या तक्रारी आहेत तरी तडवी यांना तात्काळ इतरत्र बदली करावी अशी मागणी होत आहे.

## शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शहरप्रमुख प्रवीण जाधव महाविकास आघाडीतर्फे निवडणूक लढविणार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीचे बिगुल वाजले असून प्रभाग रचना जाहीर झाल्यानंतर युती व महाविकास आघाडी यांच्यामध्ये जोरदार लढत होणार आहे. दरम्यान महाविकास आघाडीचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शहरप्रमुख प्रवीण जाधव हे महाविकास आघाडीतर्फे निवडणूक लढविण्यास इच्छुक असून पक्षश्रेष्ठी जो निर्णय घेतील तो अंतिम असेल असेही त्यांनी सांगितले आहे.

गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक, राजकीय क्षेत्रात कार्यरत असणारे प्रवीण जाधव



यांनी आपल्या राजकीय कार्याची सुरूवात शिवसैनिक म्हणून केली. गेल्या 20 वर्षापासून शिवसेनेत कार्यरत असताना गटप्रमुख, शाखाप्रमुख, उपशहरप्रमुख, ग्राहक कक्षाचे शहरप्रमुख व आता पनवेल शहरप्रमुख असा त्यांचा राजकीय प्रवास आहे. 2017 साली त्यांची पत्नी वैशाली प्रवीण जाधव ह्या निवडणूक लढलेल्या आहेत. 2022 रोजी त्यांची दि.पनवेल को.ऑप.अर्बन बँकेच्या निवडणुकीमध्ये ते निवडून आले आहेत. शहरातील विविध समस्यांबाबत ते नागरिकांबरोबर रस्त्यावर वेळोवेळी उतरले आहे व त्याचा पाठपुरावा करून त्या समस्या सोडविल्या आहेत. या संदर्भात त्यांनी सर्वच शासकीय पटलाविरोधात आवाज उठविला आहे. त्याचप्रमाणे सामाजिक कार्य करताना त्यांनी गेल्या अनेक वर्षापासून बाळासाहेब ठाकरे स्मृती चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन त्यांनी केले आहे. शहरातील पाणी प्रश्न, विद्युत पुरवठा प्रश्न तसेच अनेक नागरी प्रश्नावरुन त्यांनी अग्रस्थानी राहून हे प्रश्न सोडविण्यासाठी महानगरपालिकेकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. त्याचप्रमाणे उपजिल्हा रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांना मदत करण्याचे कार्य त्यांनी गेले अनेक वर्षापासून सुरूच ठेवले आहे. तसेच रक्तदान शिबीर, वह्या वाटप, शालेपयोगी वस्तूंचे वाटप, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन, गणेशोत्सव आदी कार्यक्रम ते राबवित असतात. या सर्व बाबींचा महाविकास आघाडीचे पक्षश्रेष्ठी विचार करून निश्चितच आपणास उमेदवारी देतील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## मृणालताई नाट्य करंडक २०२५ च्या ८ व्या एकांकिका स्पर्धेचे बिगुल वाजलं ! १९ डिसेंबरला रंगणार अंतिम फेरी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी** : एकांकिका स्पर्धा विश्वात प्रतिष्ठेची मानली जाणारी तसेच हौशी आणि होतकरू कलाकारांना हक्काचं व्यासपीठ मिळवून देणाऱ्या "मृणाल ताई नाट्य करंडक एकांकिका" स्पर्धेच्या तारखा जाहीर झाल्या आहेत.

समाजकारण आणि राजकारण आपल्या कर्तृत्वाने ठसा उमटविणाऱ्या, जनतेत 'पाणीवाली बाई ' अशी ओळख असलेल्या समाजसेविका आणि गोरेगावच्या माजी आमदार मृणालताई गोरे यांच्या स्मृती प्रित्यर्थ मृणालताई नाट्य करंडक ही खुली राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा आयोजित केली जाते .यंदाचे हे आठवे वर्ष असून दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन श्री. सुदेश सावंत यांच्या सोहम थिएटर च्या अतंर्गत केले जाते.

'मृणालताई नाट्य करंडक' या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत यंदा अनेक नाट्यसंघ, महाविद्यालयीन संघ आणि स्वतंत्र गट सहभागी होणार असून, नाट्यसंस्कृतीला नवे वळण देण्याची अपेक्षा आहे.

स्पर्धेच्या प्राथमिक फेऱ्या १२, १३ आणि १४ डिसेंबर २०२५ रोजी गोरेगाव (पूर्व) येथील केशव गोरे स्मारक ट्रस्ट सभागृहात रंगणार आहेत. तर, अंतिम फेरी १९ डिसेंबर २०२५ रोजी बोरिवली येथील प्रबोधन ठाकरे नाट्यगृहात होईल. या स्पर्धेद्वारे तरुण नाट्यकलावंतांना त्यांची कलात्मक अभिव्यक्ती मांडण्याची सुवर्ण संधी मिळणार आहे .

स्पर्धेत विजेत्यांसाठी आकर्षक पारितोषिकांची तरतूद करण्यात आली आहे. प्रथम क्रमांकासाठी ३१,००० रुपये रोख रक्कम व चषक, द्वितीय क्रमांकासाठी २१,००० रुपये व चषक, तसेच 'लक्षवेधी एकांकिके'साठी ११,००० रुपये व चषक अशी रक्कम निश्चित केली आहे. या पारितोषिकांमुळे स्पर्धा अधिक रोमांचक होईल, असा विश्वास आयोजकांचा आहे.

या स्पर्धेचा उद्देश राज्यातील नाट्यसंस्कृतीला चालना देणे, तरुण कलावंतांना प्रोत्साहन देणे आणि नाट्यकलेबद्दलचा अभिमान वृद्धिंगत करणे हा आहे. गेल्या सात वर्षांत या स्पर्धेने अनेक प्रतिभावंत घडवले असून, यंदाही तीच परंपरा कायम राहील, असे सोहम थिएटर संस्थेचे अध्यक्ष सुदेश सावंत यांनी सांगितले.सहभागी होण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी खालील संपर्क क्रमांकांवर संपर्क साधावा: ९८२१३५५२६४, ८७७९९०४१९३ किंवा ९८६७४४४४१८. नाट्यप्रेमींसाठी ही स्पर्धा एक अनमोल संधी असून, यंदाच्या पर्वाची उत्सुकता आता शिगेला पोहोचली आहे.

## परतूर नगरपालिकेसाठी तिसऱ्या दिवशी देखील एकही उमदेवारी अर्ज दाखल नाही

**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना(अशोक ठोके)** : परतूर नगरपरिषद निवडणुकीसाठी दि. 10 नोव्हेंबर ते 17 नोव्हेंबर 2025 हा कालावधी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा असून बुधवार दि. 12 नोव्हेंबरपर्यंत अध्यक्ष किंवा नगरसेवक पदासाठी एकही उमेदवारी अर्ज दाखल झाला नसल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती प्रणाली तायडे यांनी दिली आहे.

यासंदर्भात बोलताना श्रीमती तायडे यांनी सांगितले की, नगरपरिषद निवडणुकीसाठी तहसील कार्यालयाची निवडणूक यंत्रणा सज्ज झाली असून




निवडणुकीचे कामकाज सुरळीत पार पडावे यासाठी विविध कक्षांची स्थापना करण्यात आली आहे. दि. 10 ते 17 ही अध्यक्ष आणि नगरसेवक पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आहे. दि. 10,11 व 12 नोव्हेंबर या पहिल्या तीन दिवशी अध्यक्ष किंवा नगरसेवक पदासाठी एकही अर्ज दाखल झालेला नाही.

## राष्ट्रवादी शरदचंद्रजी पवार पक्षाकडून निवडणूक समितीमध्ये ओबीसी सेलच्या अरुण तोडकर यांच्या निवडीने ओबीसी सेलमध्ये उत्साह

**दैनिक युवक आधार**

**पिलीव प्रतिनिधी( रघुनाथ देवकर) :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाकडून जय्यत तयारी केली जात असून या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरच पक्षाकडून जिल्हा निवडणूक समिती जाहीर करण्यात आली आहे.

यामध्ये माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्यासह अनेक दिग्गज नेत्यांचा समावेश असून गावपातळीपासून जिल्हा पातळीपर्यंत माजी उपमुख्यमंत्री आदरणीय विजयसिंह मोहिते पाटील व खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राजकीय धडे घेऊन विविध सेलच्या माध्यमातून आणि मोहिते पाटील गटाच्या समवेत विविध पातळीवर काम करीत जिल्हा परिषदेच्या सभागृहामध्ये ग्रामीण भागातल्या समस्या पोट तिडकीने मांडून जिल्हा परिषदेच्या अनेक योजना झोपडीपर्यंत पोहोचवून मोहिते पाटील परिवाराचा खंदया समर्थक कार्यकर्त्याची भूमिका कशा पद्धतीने करतो हे ज्यांनी दाखवून दिलं

त्या राष्ट्रवादी शरदचंद्रजी पवार पक्षाच्या सोलापूर जिल्हा ओबीसी सेलचे अध्यक्ष अरुण तोडकर यांचाही समावेश झालेला आहे.

ही बातमी समजताच ओबीसी सेल मध्ये मोठ्या प्रमाणात उत्साह वाढला असून या निवडीनंतर श्री अरुण तोडकर यांनी सांगितले की आदरणीय विजयसिंह मोहिते पाटील व सन्माननीय धैर्यशील भैया मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निश्चितपणाने पक्षाची बाजू वाड्यावस्त्यापर्यंत पोहोचवून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून आपले जे उमेदवार आहेत

त्यांना निवडून आणण्यासाठी जीवाचे रान करणे हे माझे कर्तव्य आहे आणि या निवडणुकीमध्ये आमचा ओबीसी सेल निश्चितपणाने जिल्ह्यातील गावा गावांमध्ये आपल्या पक्षाची ध्येय धोरणे राबवून विजयाची मशाल तेवत ठेवल्याशिवाय राहणार नाही अशी प्रतिक्रिया आमच्या प्रतिनिधीकडे त्यांनी दिली.

## गुरुवारी भाजप महायुतीकडून उरण नगरपरिषद निवडणुकीसाठी उमेदवारांचे नामांकन दाखल होणार

### मंत्री ॲड. आशिष शेलार, लोकनेते रामशेठ ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** भारतीय जनता पार्टी महायुतीतर्फे उरण नगरपरिषदेच्या निवडणुकीकरिता नगराध्यक्ष पदाचे तसेच नगरसेवक पदाचे उमेदवार गुरुवार, दि. १३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता आपले नामांकन अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल करणार आहेत.

या नामांकन दाखल सोहळ्यास रायगड जिल्ह्याचे संपर्क प्रमुख व महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, तसेच उत्तर रायगड जिल्हा भारतीय जनता पार्टी अध्यक्ष अविनाशजी कोळी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून महायुतीचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

## पनवेल शहरातील रस्त्यांबाबत भाजपचे केदार भगत यांचे पालिकेला पत्र

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** पनवेल शहरातील रस्त्यांबाबत आणि काही गतिरोधक बसविण्याबाबत भाजपचे शहर उपाध्यक्ष केदार भगत यांनी पालिकेकडे पत्रव्यवहार केला असून पालिकेकडून देखील लवकरच कार्यवाही होणार असल्याचे त्यांना सांगितले आहे.पनवेल शहरातील हुतात्मा हिरवे गुरूजी मार्ग म्हणजे जुने आदर्श हॉटेल ते छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा हा मार्ग खड्डयांनी व्यापला आहे. हीच



परिस्थिती कापड गल्ली, स्वामी हॉटेल ते गावदेवी मंदिर, तक्का येथील पेट्रोल पंप जवळ देखील आहे. हे सर्व रस्ते शहरातील मुख्य रस्ते आहेत खड्डयातून मार्गक्रमण करताना नागरिकांना विशेषकरून वाहनचालकांना जिकिरीचे झाले आहे. पावसामुळे काही महिने नागरिकांनी रस्त्यामुळे होणार हाल सोसले आहेत. पण आता पावसाचे प्रमाण नगण्य झाले आहे. त्यामुळे आता तातडीने नागरिकांना खड्डेमुक्त आणि धूळमुक्त रस्ते हवे आहेत. त्यामुळे याबाबत गांभीर्यपूर्वक विचार करून रस्त्यांची डागडुजी आणि शक्य असेल तिथे नवीन रस्ते करावेत.तसेच शहरातील मुख्य मार्केट (हनुमान मंदिर) ते उरण नाका रस्ता आमच्या परिसरातून जातो आणि त्या रस्त्यावर वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात आहे. व येथील रहिवाश्यांना त्रास होत आहे. वाहतूक कोंडी होत आहे. अनेक वाहनचालक येथे अतिवेगाने वाहने चालवतात. त्यामुळे अपघात होण्याचा धोका वाढला असून, शाळकरी मुले, वृद्ध व्यक्ती आणि पादचारी यांना रस्ता ओलांडताना अडचण निर्माण होते. संबंधित ठिकाणी स्पीडब्रेकर (गतिरोधक) बसविण्यात यावेत अशा आशयाचे पत्र भाजपचे शहर उपाध्यक्ष केदार भगत यांनी पालिकेच्या आयुक्तांना दिले आले

## डोंबिवलीत प्रचंड उत्साहात 'डोंबिवलीकर फ्रेंडशिप रन २०२५' संपन्न !

**दैनिक युवक आधार**
**डोंबिवली(गुरुनाथ तिरपणकर)**

हजारो धावपटुंचा उत्साह, असंख्य चेहऱ्यांवरील आनंद आणि वातावरणात सर्वत्र संचारलेली आगळीवेगळी ऊर्जा यामुळे आजची सकाळ कल्याण - डोंबिवलीकरांसाठी अविस्मरणीय ठरली.

याला निमित्त ठरली डोंबिवलीकर एक सांस्कृतिक परिवार आणि कल्याण डोंबिवली रनर्स ग्रुप यांच्या वतीने आयोजित 'डोंबिवलीकर फ्रेंडशिप रन २०२५'! या भव्य हाफ मॅरेथॉन प्रसंगी विविध वयोगटांतील धावपटुंसाठी २१.१ किमी चॅलेंज, १० किमी रेस आणि ५ किमी



(टाईम्ड) ईझी रन अशा विविध रेस कॅटेगरीज आयोजित करण्यात आल्या होत्या. तसेच ५ किमी आणि १.६ किमी अंतराचे (नॉन-टाईम्ड) फन रन हे या हाफ मॅरेथॉनचे मुख्य आकर्षण ठरले.

धावपटुंचा उत्साह वाढवण्यासाठी सुप्रसिद्ध अभिनेता गश्मीर महाजनी आणि विश्वविजेती भारतीय बॉक्सर साक्षी चौधरी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. दोन्ही प्रमुख पाहुण्यांसमवेत १.६ किमी फन रनमध्ये सहभागी झालो आणि मॅरेथॉनचा उत्साहपूर्ण व ऊर्जादायी अनुभव घेतला. तसेच विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

'डोंबिवलीकर फ्रेंडशिप रन २०२५' ही भव्य हाफ मॅरेथॉन मैत्रीचा उत्सव, फिटनेसचा संकल्प आणि एकात्मतेचा प्रवास असा त्रिवेणी संगम ठरली.

## समाजान धम्म अंगिकरणासाठी विविध संस्कार शिबीराची आवश्यकता: जिल्हाउपाध्यक्ष शालिग्राम पठाडे

**दैनिक युवक आधार**

**रिसोड (तालुका प्रतिनीधी). रणजितसिह. ठाकूर.**

**रिसोड - महात्मा फुले नगर रिसोड.**

येथे दि. १० नोव्हेंबर २०२५ ला भारतीय बौद्ध महासभा तालुका रिसोड व समता सैनिक दल यांचा संवाद मिळावा संपन्न झाला. या मेळावा कार्यक्रमाचे अध्यक्ष माधवराव हिवाळे होते. तर प्रमुख मार्गदर्शक जिल्हाउपाध्यक्ष शालिग्राम पठाडे, जनरल मेजर अश्विन खिल्लारे, प्रमुख उपस्थितीत जिल्हा सरचिटणीस देवानंद वाकोडे. होते. यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून लाभलेले भारतीय बौद्ध महासभा जिल्हा सरचिटणीस देवानंद वाकोडे होते. . सर्वप्रथम जनरल मेजर अश्विन खिलारे यांनी समता सैनिक दलाची परेड घेतली. नंतर मानवरांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले मान्यवरांच्या हस्ते पुष्प व पुष्प हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. जिल्हा संस्कार प्रमुख शालिग्राम पठाडे सर यांनी उपस्थितांना त्रिसरण पंचशील दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामजी बनकर कोषाध्यक्ष यांनी केले जिल्हा संस्कार प्रमुख शालिग्राम

पठाडे सर यांनी विविध संस्कार शिबिराबद्दल माहिती सांगितली , महिलासाठी उपासिका धम्म प्रशिक्षण, तर पुरुषांसाठी श्रामणेर शिबिर, महत्त्वाचे आहे. इतरही व्यवसाय प्रशिक्षण शिबीर, अंधश्रद्धा निर्मूलन शिबीर, आरोग्य शिबीर, बालसंस्कार शिबीर असे विविध शिबीर घेऊन समाजात धम्मानुसार आचरण व समाज हा सुसंस्कृत बनण्यासाठी समाजाला भारतीय



बौद्ध महासभेकडुन होणा-या शिबीरात सहभागी होऊन प्रशिक्षण घ्यावे अशा प्रकारे विस्तृत माहिती सांगितली. जिल्हा मेजर जनरल अश्विन खिलारे यांनी समता सैनिक दलाचे महत्त्व सांगितले व समता सैनिक दलामध्ये नियम काय असतात हे सुद्धा उपस्थित समता सैनिक दलांना सांगितले. समता सैनिक दलाच्या कामकाजाबद्दल संपूर्ण

माहिती सांगितली जिल्हा सरचिटणीस देवानंद वाकोडे सर अभिमन्यू पंडित सर तालुका संरक्षण प्रमुख गणेश कवडे सर पंजाब नरवाडे सर नारायण मोरे सर माणिक खिलारे साहेबराव नवघरे सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

भारतीय बौद्ध महासभेत तालुका अध्यक्ष तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष माधवराव हिवाळे आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी सांगितले की आम्ही रिसोड तालुक्यात जास्तीत जास्त शिबिर राबवू राबवू सैनिक बनवू असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला उपस्थित शेलगाव राजगुरे, गोवर्धना, येवता, मसला पेन, बाळखेडा, जांब, गोंढाळा, केनवड, करडा, इत्यादी गावचे समता सैनिक दल उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देविदास सोनुने तालुका सरचिटणीस यांनी केले. व आलेल्या सर्व प्रमुख पाहुण्याचे आभार कैलास सुर्वे यांनी मानले शेवटी सरणातय घेऊन कार्यक्रमाचे सांगता करण्यात आली.

# सोयगाव अवकाळीच्या संकटातून सावरत शेतकऱ्यांची रब्बी पेरणीला गती

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव वार्ताहर** : परिसरातील व तालुक्यात अवकाळी पावसाने मागील काही दिवसांपासून उघडीप दिली आहे. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असले,तरी आता सोयगाव परिसरातील व तालुक्यातील शेतकरी पुन्हा नव्या जोमाने रब्बी हंगामाच्या तयारीला लागले आहेत. नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसामुळे उभ्या पिकांचे तसेच मका,कपाशी, सोयाबीन,व शेतीचे मोठे नुकसान झाले.तरीही शेतकरी वर्ग निराश न होता नव्या हंगामात आपल्या भविष्याची नवीन स्वप्नं पाहत आहे. तालुक्यात यंदाच्या रब्बी हंगामात सुमारे ९ हजार ४६० हेक्टर क्षेत्रात पेरणीचे लक्ष्य ठेवण्यात आले असून, त्यापैकी रब्बी ज्वारी 1,51हेक्टर, गहु 72 हेक्टर, मका 5,80, हेक्टर,हरभरा 2,99 हेक्टर क्षेत्रात पेरणी पूर्ण झाल्याची माहिती कृषी अधिकारी भारत कासार यांनी दिली.यामध्ये




हरभरा,गहू,ज्वारी,मका,बाजरी या प्रमुख पिकांचा समावेश आहे. अवकाळी पावसामुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतात ओलावा टिकून राहिल्याने रब्बी पिकांसाठी ही अनुकूल स्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांनी पेरणीला गती देत काम सुरू केले असून,बाजारात बियाणे,खते,शेतीसाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी गर्दी दिसून येते आहे.शिवाय बऱ्याच शेतकऱ्यांची अद्यापही शेतात मक्याचे कणसे तसेच पडून आहे शेतकरी मजुरांची कुशामत करून कणसे गोळा करून लागले आहेत.शिवाय खरिपातखते व शेतीसाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी गर्दी दिसून येत आहे.शिवाय बर्याच शेतकऱ्यांची अद्यापही शेतात मक्याचे कणसे तसेच पडून आहेत.

शेतकरी मजुरांची खुशामत करून कणसे गोळा करू लागले आहेत.शिवाय खरिपात शेतकऱ्यांचा हातात काहीच लागले नसल्याने आपल्या काळजावर दगड ठेवून शेतकरी रब्बीची तयारी करीत असल्याचे चित्र दरम्यान सोयगाव परिसरात व तालुक्यात दिसत आहे. हा हंगाम "मेहनतीच्या हंगाम" त्यांच्या आयुष्यात सुख-समृद्धी घेऊन येईल अशी अपेक्षा व्यक्त करीत आहे.दरम्यान मागील चार पाच वर्षांपासून शेतकऱ्यांवर नैसर्गिक संकटाची मालिकाच सुरु असल्याने शेतकरी हतबल झाले आहेत.पेरणीसाठी केलेला खर्चही निघत नसल्याने आर्थिक नियोजन बिघडले आहे...

**चांगल्या पावसाची अपेक्षा**

अवकाळी पावसाने खरिपातील सोयाबीन आणि कपाशीचे नुकसान झाले,पण शेतकरी म्हणून हार मानायची नाही.आता आम्ही रब्बीत हरभरा आणि गहू पेरणी सुरू केली आहे. बियाणे आणि खतांच्या किंमती वाढल्या असल्या तरी चांगल्या पावसाच्या अपेक्षेने आम्ही नव्या उत्साहाने पुन्हा कामाला लागलो असल्याचे सोयगाव शहरातील शेतकरी प्रकाश बोर्डे यांनी सांगितले.

**शेतकरी पेरणीच्या कामात मग्न...**

सध्या परिसरात व तालुक्यात सर्वत्र ट्रॅक्टर,बैलजोड्या आणि शेतकरी पेरणीच्या कामात मग्न असल्याचे दृश्य दिसत आहे. अवकाळीच्या संकटानंतरही शेतकऱ्यांचा आशावाद टिकून असून,त्यांच्या कष्टातून नव्या हंगामाची आशेची पालवी फुटताना दिसून येत आहे.

**हवामानाची परिस्थिती अनुकूल**

अवकाळीमुळे शेतकऱ्यांना काही प्रमाणात फटका बसला असला, तरी आता हवामानाची परिस्थिती अनुकूल आहे. शेतकऱ्यांनी वैज्ञानिक पद्धतीने पेरणी करावी.विशेषतः ओलावा व्यवस्थापन व बियाण्यांची गुणवत्ता तपासून पेरणी केल्यास उत्पादनात वाढ होईल.कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन दिले जात आहे. पेरणीसह कृषी विभागांतर्गत काही अडचणी असतील तर शेतकऱ्यांनी थेट तालुका कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा.त्यांच्या शंकेचे निरसन केले जाईल.

# निलंबित तहसिलदार सुर्यकांत येवलेंची कुंडली; अधिकारी जितका भ्रष्ट तितका राजकर्त्यांचा लाडका

**दैनिक युवक आधार**

**मुंबई । प्रतिनिधी :** पुणे मुंढवा येथील जमीन खरेदी प्रकरणातील पुण्याचे निलंबित तहसिलदार सूर्यकांत येवलेच्या निमित्ताने पुन्हा असे सिद्ध झालं की अधिकारी जितका भ्रष्ट, तितका तो राजकारण्यांचा लाडका असल्याचे दिसून आले आहे. या अशा लाडक्या माणसाला नागपूरहून पुण्यात कुणी आणि का आणलं? इतके गंभीर आरोप असूनही त्याला कार्यकारी पद का देण्यात आलं? त्याच्यामागे कोणाचं राजकीय छत्र आहे? असा सवाल आपल्या X या समाजमाध्यमातून ट्विट करत पुण्यातील सामाजिक कार्यकर्ते विजय कुंभार यांनी केला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने अशा पदावरील अधिकाऱ्यांच्या बदल्यांमध्ये घोटाळा होऊ नये, राजकीय हस्तक्षेप होऊ नये यासाठी महाराष्ट्रासह सर्व राज्यांमधे नागरी सेवा मंडळ नावाची यंत्रणा स्थापन करणे बंधनकारक केले आहे. ती यंत्रणा येवले प्रकरणात काय करत होती? की, त्या यंत्रणेला डावलून येवलेची बदली केली ? केली असेल कोणी केली? नागरी सेवा मंडळाने शिफारस केली असेल तर त्यांच्या सदस्यांवर कोण आणि कधी कारवाई करणार? असेही सवाल कुंभार यांनी केले आहेत.

**येवलेंचे काही पराक्रम पुढील प्रमाणे ....**

निलंबित तहसिलदार सुर्यकांत येवले यांनी २००१ मध्ये राज्यसेवा मुख्य परीक्षा दिली. ३६१ गुण आणि अपंग (कर्णबधिर) कोट्यातून पास झाल्याने त्यांना नागपूर विभागात २००४ मध्ये नायब तहसीलदार पद देण्यात आले. पण खरंच ते कर्णबधिर आहेत का ? नसतील तर हे थेट महाराष्ट्रातील पूजा खेडकर प्रकरण ठरेल ! त्याआधी येवलेंनी सर्वसाधारण गटातून परीक्षा दिली होती असे म्हणतात. २००१ चा एमपीएससी परीक्षा घोटाळा गाजला होता. ३९८ उमेदवारांच्या उत्तरपत्रिका बदलल्या,प्रत्येकाकडून ₹ ३,ते ₹ ५ लाख घेतल्याचे आरोप झाल्यानंतर मुंबई हाय कोर्टाने सर्व नियुक्त्या रद्द केल्या होत्या. आता ज्यांची सेवेत रुजू होतानाची कारकीर्द अशी असेल त्यांच्याकडून चांगल्या वर्तणुकीची अपेक्षा कशी करता येईल ? असा खोचक सवाल करून कुंभार यांनी सुर्यकांत येवले यांच्या कुंडलीच पुढे मांडली आहे. येवले याना २०११ मध्ये उमरेड (नागपूर) येथे ₹ १०,००० ची लाच घेताना पकडले.६ दोषारोपपत्रं ठेवण्यात आली, पण चौकशीचा पत्ता नाही.

त्यानंतर गडचिरोलीला हजर न राहिल्यामुळे त्याचं निलंबन करण्यात आलं पण सेटिंग लावून परत रुजू झाले .२०१४ मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील सिरोंचा कोतवाल भरती प्रकरणात प्रत्येकाकडून ₹ २ ते ₹ २.५ लाख लाच घेतल्याचा आरोप. हा प्रकार कानावर येताच नक्षलवाद्यांनी अशा अधिकाऱ्यांना सोडणार नाही असे जाहिर केले.२०१६ मध्ये पुणे विभागात बदली. पुणे जिल्हा पुरवठा अधिकारी – मंत्रालयातून “सेटिंग” करून पोस्टिंग. २०१६ मध्येच इंदापूर तहसीलदार म्हणून रुजू ५८ सरकारी जमिनींचं अनियमित वाटप,वाळूमाफियाकडून संगनमत यामुळे जिल्हाधिकारी पुणे यांनी निलंबन केलं.

१४ वर्षांत ७ वेळा भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप, पण प्रत्येक वेळी “सेटिंग” लावून बचाव ! मोबोज हॉटेल जमीन घोटाळा प्रकरणी त्यांच्याविरुद्ध आरोप करण्यात आले, आंदोलने झाली परंतु पुढे काहीच झाले नाही. आता येवले "मुंढवा जमीन घोटाळा" प्रकरणात अमेडिया कंपनीला फायदा पोहोचवण्यासाठी प्रचंड सक्रिय होते. अशा प्रकारे विजय कुंभार यांनी निलंबित तहसिलदार सुर्यकांत येवले यांची कुंडलीच आपल्या X या समाज माध्यमावरून ट्विट करत प्रसारीत केली आहे.

# शीलाताई बाळासाहेब काजळे : सेवाभावी वृत्तीने सज्ज उमेदवार

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार**

नगर परिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून, प्रभाग क्रमांक १२ मधून शीलाताई बाळासाहेब काजळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची तयारी केली आहे. सेवाभावी वृत्ती, समाजकारणातील सक्रियता आणि नागरिकांशी घट्ट नाते यामुळे त्या या प्रभागातील उल्लेखनीय उमेदवार ठरत आहेत.

शिलाताईंचे पती बाळासाहेब काजळे हे गेल्या अनेक वर्षांपासून राजकारण आणि समाजकारणात अग्रेसर राहिले आहेत. स्थानिक पातळीवर त्यांनी विविध सामाजिक उपक्रम राबवले असून, अनेक गरजूंना व गोरगरीब रुग्णांना



मदतीचा हात दिला आहे. त्यांच्या कार्यातूनच शीलाताईंनी जनसेवेचा वारसा आत्मसात केला आहे.

आरोग्यदूत म्हणून ओळख असलेले बाळासाहेब व त्यांच्या पत्नी शिलाताई यांनी आरोग्य क्षेत्रातही उल्लेखनीय काम केले आहे. नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करणे, महिलांच्या अडचणींना प्राधान्याने हाताळणे आणि प्रत्येक घटकापर्यंत सेवा पोहोचवणे हे त्यांचे ध्येय आहे.

प्रभाग क्रमांक १२ मधील नागरिकांच्या अपेक्षा आणि समस्या समजून घेऊन त्यावर उपाययोजना करणे, हा त्यांचा प्रमुख उद्देश असल्याचे त्या सांगतात. जनतेच्या विश्वासावर आणि कार्याच्या बळावर प्रभागातील विकासाचा नवा अध्याय लिहिण्याचा त्यांचा निर्धार आहे.

राजकारण म्हणजे सत्तेसाठी नव्हे, तर सेवेचा मार्ग — हे ब्रीद शीलाताईंच्या कार्यातून दिसून येते. त्यामुळेच त्यांची निवडणूक लढवण्याची तयारी नागरिकांमध्ये सकारात्मक चर्चेचा विषय ठरली आहे.

# हनुमंतगाव मध्ये भिल्ल समाजाच्या प्रमुख नेत्यांची बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**

**लोणी ( प्रतिनिधी ) ज्ञानेश्वर साबळे :** राहता तालुक्यातील हनुमंतगाव येथे भिल्ल समाजाच्या प्रमुख नेत्यांची बैठक संपन्न झाली असून बैठकीत आदिवासी बचाव समिती स्थापन करणार असल्याचा एकमुखी निर्णय सर्व आदिवासी नेत्यांनी घेतला आहे अशी माहिती आदिवासी नेते ज्ञानेश्वर अहिरे यांनी दिली.

श्री. अहिरे म्हणाले की येत्या १६ नोव्हेंबर रोजी आदिवासी बचाव समिती स्थापन झाल्याची अधिकृत घोषणा लोणी येथील बैठकीत केली जाणार आहे. डॉ. मच्छिंद्र निकम यांच्या दशक्रिया विधी निमित्त जिल्ह्यातील प्रमुख भिल्ल समाजाचे नेते मोठ्या संख्येने हनुमंतगाव येथे उपस्थित होते. डॉक्टर निकम यांना श्रद्धांजली वाहिल्यानंतर त्या ठिकाणी बैठक घेण्यात आली त्यावेळी



आदिवासींमध्ये होणारी घुसखोरी तसेच आदिवासींचे इतर प्रश्न या विषयावर प्राथमिक चर्चा झाली. व जिल्ह्यातील सर्व आदिवासी नेत्यांनी एकत्रित लढा देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला त्यामुळे आदिवासी मधील होणाऱ्या घुसखोरी विरोधात जोरदार आवाज उठवला जाणार आहे त्याची पहिली ठिणगी हनुमंतगाव येथे झालेल्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत पडली आहे. यावेळी आदिवासी भिल्ल समाजाच्या प्रमुख नेत्यांनी आपआपली मते मांडली. सर्वांचा सूर एकच होता त्यामुळे जिल्ह्यातील सर्व आदिवासी नेत्यांनी एकत्र येऊन लढा देण्याचा निर्णय प्राथमिक चर्चेत घेण्यात आला या नंतर लोणी येथे होणाऱ्या बैठकीत अधिकृत घोषणा केली जाणार आहे. या बैठकीला ज्ञानेश्वर अहिरे, शिवाजीराव गांगुर्डे, कैलास दादा माळी, दिलीपराव बर्डे, सुभाषराव पवार, रंगनाथ आहेर,मच्छिंद्र निकम, रावसाहेब बर्डे ,बाळासाहेब गांगुर्डे ,अनिल रोकडे, राधाकृष्ण बर्डे ,मारुती बर्डे,सोमनाथ माळी ,संतोष मोरे ,भारत बर्डे, सोमनाथ बर्डे, मारुती बर्डे, संपतराव मोरे ,सुदामराव मोरे, राजेंद्र पिंपळे ,गोरख पवार, चंद्रकांत रोकडे ,प्रल्हाद माळी ,चंद्रशेखर रोकडे ,बाळासाहेब पथवे ,जालिंदर निकम ,परसराम माळी, चंद्रकांत धीरोडे आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कथा झुंज छत्रपतीची.... कधी न संपणाऱ्या युध्दाची.....!

**सणसर :- विकास क्षत्रिय**

शुक्रवार दिनांक ३१ऑक्टोबर 2025 रोजी मा.ना. श्री.अजित दादा पवार उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य आणि मा.ना.श्री दत्तामामा भरणे कृषिमंत्री महाराष्ट्र राज्य विद्यमान चेअरमन पृथ्वीराज बापू जाचक व्हॉइस चेअरमन कैलास तात्या गावडे विद्यमान संचालक मंडळ ऊस उत्पादक शेतकरी सभासद बांधव आणि कामगार बांधवांच्या यांच्या उपस्थितीमध्ये श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्या च्या युनिट १ चा ७० वा आणि युनिट २ चा ९ वा गळीत हंगामाचा शुभारंभ झाला कारखान्याचा गळीत शुभारंभ करण्यापूर्वी सर्व कामे आणि कारखाना सुरू करण्या पूर्वीची चाचणी उत्तम रित्या पार पडली. तसे पहिले तर बुधवार दिनांक २८ मे २०२५ ला नवीन संचालक मंडळाने कार्यभार स्वीकारल्यानंतर...पहिले ब्रीदवाक्य ते म्हणजे...!

**"माझा कारखाना माझी जबाबदारी"**

तयार करण्यात आले आणि हंगामाचा शुभारंभ करताना........दुसरे ब्रीद वाक्य तयार केले

"काटा चोख ,पैसे रोख, ऊस घाला बिनधोक"* असा नारा दिला.

साखर कारखान्यावरती आणि विशेष करून सहकारी साखर कारखान्या वरती आसमानी (नैसर्गिक) आणि सुलतानी (मानवनिर्मित) संकट येतच असतात आसमानी संकटांचा सामना ऊस उत्पादक शेतकरी करत असतोच,परंतु सुलतानी संकटांच्या पुढे शेतकरी हतबल होतो.

आणि तीच कथा श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याची आहे.*परकीय शत्रू मध्ये एवढी ताकद कदापी नव्हती,की ज्यामुळे छत्रपती शिवरायांनी संकल्पित केलेले स्वराज्य धोक्यात आले.ते स्वराज्य धोक्यात आले ते आपल्या मधीलच फंद-फितूरी मुळे....

आज श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या बाबतीत सर्व काही ठीक आहे.परंतु छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे सभासद मालक आहेत. ऊस उत्पादक सभासद त्यांनी त्यांच्या शेतामध्ये पिकवलेला ऊस श्री छत्रपतीला घालावा.सर्व काही व्यवस्थित होईल छत्रपती सहकारी साखर कारखाना पुन्हा गतवैभव प्राप्त करेल. श्री छत्रपती सहकारी साखर पुन्हा गगन भरारी घेईल.श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या धुराडा मधून सोन्याचा धूर निघेल. परंतु त्यासाठी शेतामध्ये पिकवलेलं सोन्याचं टिपरं श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याला घातलं पाहिजे.

या प्रक्रियेमध्ये संचालक मंडळातील संचालक तीन या चार च्या ग्रुपमध्ये रात्रीची पाळी मध्ये ( रात्री ०८ ते पहाटे ०४) हजर रहातात. त्याप्रमाणे सर्व संचालक अधिकारी कामगार,ऊस तोडणी कामगार आणि ऊस वाहतूकदार ताकदीने दिवस-रात्र काम करीत आहेत.

काल या हंगामातील ११ दिवस पार पडला.प्रतीकुल परिस्थितीत ठरविलेल्या उदिष्टाकडे झेप घेत आहोत. काल दोन्ही प्लंटचे एकुण गाळप ७६८१मे.टन आणि साखर निर्मिती ७६०० क्वी.आता परीक्षा आहे श्री छत्रपतीच्या अस्तित्वाची आणि श्री छत्रपतीच्या सभासदांच्या प्रामाणिक प्रामाणिकपणाची...!

"कारण ही घटीका आहे.कधी न संपणाऱ्या युद्धाची"....!

"साथ हवी प्रामाणिक पणाने सर्वांची"....!!



# दादर येथे सहकार स्नेह संमेलन आणि स्मरणिका प्रकाशन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी :** बृहन्मुंबई सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित "पतसंस्था परिवार " ह्या मासिकास 25 वर्ष पुर्ण होत असल्याच्या निमित्ताने गुरुवार दिनांक 13 नोव्हेंबर रोजी दुपारी 4 वाजता "शिवाजी मंदिर सभागृह" दादर येथे सहकार स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात "पतसंस्था परिवार रौप्य महोत्सवी स्मरणिकेचे प्रकाशन देखील करण्यात येणार येणार आहे.

फेडरेशनचे अध्यक्ष,मासिकाचे संपादक श्री शिवाजीराव नलावडे हे सतत मासिकाच्या माध्यमातून पतसंस्थेसाठीची शासनाची परिपत्रके , आदेश,सूचना,GR ह्या संदर्भात मार्गदर्शन व पतसंस्थांमध्ये जागरूकता निर्माण करत असतात. ते सर्व या स्मरणिकेमध्ये आहे. या प्रकाशन सोहळ्याला महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री श्री अजितदादा पवार, सहकार मंत्री मा. नामदार श्री बाबासाहेब पाटील, नामदार श्री प्रविण दरेकर (अध्यक्ष मुंबै बँक), नामदार श्री पंकज भोयर (सहकार राज्य मंत्री) व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी सहकार क्षेत्रातील सर्व नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन बृहन्मुंबई पतसंस्था फेडरेशन लिमिटेडचे अध्यक्ष शिवाजीराव नलावडे यांनी केले आहे

# थाटामाटात पार पडला श्रीशिवाजी विद्यालयातील शिक्षक व माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा ; २८ वर्षांनंतर जमले डॉक्टर, इंजिनिअर आणि उच्चपदस्थ

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** देहूरोड येथील श्री शिवाजी माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यालय व व्यवसायातील १९९६-१९९७ या १० वी बॅचमधील शिक्षक व माजी विद्यार्थी यांचा स्नेहमेळावा नुकताच थाटामाटात पार पडला. यावेळी तब्बल २८ वर्षानंतर शिक्षक व माजी विद्यार्थी यांच्या चेहऱ्यावर प्रचंड उत्साह, प्रेम, उर्जा यांचा सुंदर मिलाफ पहावयास मिळाला. या स्नेहसंमेलनात विविध विषयातील सुमारे ४० शिक्षक व १२० माजी विद्यार्थी यांनी सहभाग घेतला. या शाळेतील माजी विद्यार्थी, उच्चपदस्थ सरकारी अधिकारी, प्राध्यापक, डॉक्टर, इंजिनिअर, अनेक



खाजगी कंपनीमध्ये मॅनेजर, आय.टी. क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्ती/तज्ञ, नगरसेवक व इतर अशा समाजातील प्रत्येक क्षेत्रात काम करत आहेत. सर्व माजी विद्यार्थ्यांनी याचे श्रेय शाळेलाच दिले हे विशेष.

श्री शिवाजी विद्यालय, देहूरोड ही शाळा सन १९६१ पासून देहूरोड व आजूबाजूच्या ग्रामीण भागात शिक्षणाच्या पवित्र कार्यात अग्रेसर आहे. या शाळेने शिक्षण क्षेत्राच्या पवित्र कार्याद्वारे अनेक पिढ्या घडविल्या, शाळेने शिक्षणाच्या माध्यमातून लावलेल्या बिजांना अंकुर फुटून त्याचा वटवृक्ष झाला आहे व तो वटवृक्ष समाजास दिशा दाखविण्याचे कार्य करत आहे.

या स्नेहसंमेलनास माजी प्राचार्य श्री. डुंबरे , श्री. शिंदे, सध्याचे प्राचार्य श्री. शिंदे, तसेच अनेक शिक्षकांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध प्रेरणादायी व्यक्ते व निवेदक प्रा. लक्ष्मण शेलार यांनी केले. कार्यक्रमाची प्रस्तावना श्री. मोहन पाटील, सहाय्यक डाक अधिक्षक, मुंबई यांनी केली. तर आभार प्राध्यापक सौ सुवर्णा धुमाळ सिध्दे यांनी केले.

# नगरपालिका निवडणुकीत महायुतीतील पक्षांशी आघाडी नाही, ही सत्तेची नाही तर विचारांची लढाई, सर्वाधिक जागा लढवण्यावर काँग्रेसचा भर: हर्षवर्धन सपकाळ

- नगरपालिका निवडणुकीसाठीचा उमेदवारी अर्ज अत्यंत किचकट, अर्ज बाद होण्याची शक्यता, अर्ज भरण्याची प्रक्रिया ऑफलाईन, सुटसुटीत व सोपी करा.
- काँग्रेसच्या राज्य निवडणूक मंडळाच्या बैठकीत नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकीतील उमेदवारांच्या नावावर सविस्तर चर्चा.
- महायुती सरकारमध्ये 'तुम भी खावो, हम भी खाते है', अजित पवार 'तो मी नव्हेच' मधील 'लखोबा लोखंडे'च्या भूमिकेत.

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत आघाडी वा युती करण्याचे अधिकार स्थानिक पातळीवर दिले असले तरी काँग्रेस पक्ष विचारधारेवर अढळ असून सत्तेची नाही तर विचारांची लढाई आहे. इंडिया आघाडीतील पक्ष व इतर समविचारी पक्षांशी आघाडीबाबत चर्चा होत आहे पण महायुतीतील कोणत्याही पक्षाही युती केली जाणार नाही असे स्पष्ट करून या निवडणुकांमध्ये सर्वाधिक जागा लढवण्यावर काँग्रेस पक्षाचा भर आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले आहे.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेस पक्षाच्या राज्य निवडणूक मंडळाची महत्वाची बैठक टिळक भवन, दादर येथे झाली. या बैठकीला विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते आ. विजय वडेट्टीवार, विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे नेते आ. सतेज ऊर्फ बंटी पाटील, काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य नसीम खान, खा. रजनीताई पाटील, माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, खा. चंद्रकांत हंडोरे, माजी मंत्री आ. अमित देशमुख, आ. विश्वजित कदम, गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे, महिला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष संध्याताई सव्वालाखे, युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे, एनएसयुआयचे प्रदेशाध्यक्ष सागर साळुंखे, सेवादलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव बी. एम. संदीप, मुजफ्फर हुसेन, प्रदेश उपाध्यक्ष




संघटन व प्रशासन ॲड. गणेश पाटील, मोहन जोशी, कोषाध्यक्ष अभय छाजेड यांच्यासह निवड मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, नगरपालिका निवडणुकीसाठी काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह आहे. प्रत्येक जिल्ह्यात आढावा बैठका, संकल्प सभा संपन्न होत आहेत, प्रत्येक जिल्ह्याला वरिष्ठ निरीक्षक तसेच विधानसभा मतदार संघासाठी निरीक्षक नियुक्त केलेले आहेत, त्यांनी जिल्ह्या जिल्ह्यात जाऊन इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतलेल्या आहेत. शेवटच्या दिवसाची वाट न पहाता या बैठकीत निर्णय होतील. सर्वसमावेशक धोरण अवलंबून तिकीट वाटपातही सत्तेचे विकेंद्रीकरण व पारदर्शकता आणली जाईल तसेच आढावा घेऊन पुढील सूचना दिल्या जातील.

**इंडिया आघाडी व मित्रपक्षांशी आघाडी**

पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, इंडिया आघाडी म्हणून चर्चा करण्याच्या सुचना स्थानिक नेतृत्वाला दिल्या होत्या त्यानुसार त्यांनी घटक पक्ष तसेच स्थानिक आघाडीसंदर्भात चर्चा केली आहे. वामनराव चटप, राजू शेट्टी यांच्या शेतकरी संघटना, महादेव जानकर यांचा पक्ष यांच्याशी चर्चा सुरु असून काही जिल्ह्यात वंचित बहुजन आघाडीबरोबर आघाडी झाली आहे. मनसेसंदर्भात आघाडीचा कोणताही प्रस्ताव आमच्याकडे आलेला नाही, असे सपकाळ यांनी स्पष्ट केले. तसेच मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका अद्याप जाहीर झालेल्या नाहीत कालच आरक्षण जाहीर झाले आहे. निवडणुका जाहीर झाल्यानंतरच आघाडी करायची की स्वबळावर लढायचे यावर निर्णय घेतला जाईल, असेही सपकाळ म्हणाले..

**उमेदवारी अर्ज प्रक्रिया सोपी व सुटसुटित करा**

राज्यातील नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया अत्यंत किचकट आहे. हा उमेदवारी अर्ज तब्बल २५ पानांचा असून तो ऑनलाईन पद्धतीने भरून त्याची प्रिंट काढून ऑफलाईन सादर करावयाचा आहे.ऑनलाईन अर्ज भरताना अनेक भागात इंटरनेट, सर्व्हर डाऊनच्या अडचणी येतात त्यामुळे विधानसभा व लोकसभा निवडणुकीला ज्यापद्धतीने अर्ज भरण्याची प्रक्रिया असते तशीच सोपी पद्धत असावी तसेच हे उमेदवारी अर्ज ऑफलाईन पद्धतीने भरण्याचीही मुभा द्यावी अशी मागणी करणारे पत्र काँग्रेसने निवडणूक आयोगाला पाठवले आहे, अशी माहिती सपकाळ यांनी दिला.

**पार्थ पवार यांच्यावर कारवाई होणार नाही**

पार्थ पवार यांच्या भूखंड घोटाळयावर बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, पार्थ पवार यांच्यावर कोणतीही कारवाई होणार नाही. भाजपा महायुती सरकार बेशरम आहे. 'ना खाऊंगा, ना खाने दुंगा' म्हणत सत्तेवर आले पण आता 'तुम भी खावो, हम भी खाते है', असा कारभार सुरु असून उपमुख्यमंत्री अजित पावर हे 'तो मी नव्हेच' नाटकातील 'लखोबा लोखंडे'ची भूमिका पार पाडत आहेत, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

**भाजपा महायुती सरकारमध्ये गुंडगिरीला राजाश्रय**

राज्यातील कायदा सुव्यवस्थेवर बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, भाजपा महायुती सरकारमध्ये गुंडगिरीला राजाश्रय दिला जात आहे. तुळजापूरमध्ये ड्रग प्रकरणातील आरोपीला भाजपाने पक्षात घेतले आहे. मटका माफिया, लँड माफिया, ड्रग माफिया यांना भाजपात प्रवेशही दिला जात आहे. सरकार मध्येच गँगवॉर सुरु असून सरकारच गुंडगिरीलाही खतपाणी घालत आहे. सत्ताधारी पक्षाचे आमदार बाबा सिद्दीकी यांच्या हत्येची पाळंमुळं सापडत नसल्याने त्यांच्या कुटुंबियांना कोर्टात जावे लागते हा सरकारचा पराभव आहे, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

---

# ग्लोबल महाराष्ट्र बिझनेस फोरम (GMBF) तर्फे 'महाबिझ दुबई २०२६'ची लंडनमध्ये घोषणा

## ▸▸ जागतिक व्यावसायिक सहयोगासाठी प्रभावी मंच!

**दैनिक युवक आधार**

**मुंबई वार्ताहर :** जीएमबीएफ ग्लोबल महाबिझ दुबई २०२६ या आगामी आंतरराष्ट्रीय व्यावसायिक अधिवेशनाची अधिकृत घोषणा लंडन येथील 'द शेरेटन हिथ्रो' या पंचतारांकित हॉटेलमध्ये झालेल्या यशस्वी रोडशो दरम्यान करण्यात आली. या कार्यक्रमात युनायटेड किंगडम आणि भारतातील प्रमुख उद्योजक, व्यावसायिक आणि समाजसेवी प्रतिनिधी एकत्र आले आणि जागतिक व्यावसायिक सहकार्यासाठी नव्या संधींवर चर्चा केली.

'जीएमबीएफ'चे बोर्ड सल्लागार डॉ. साहित्य चतुर्वेदी हे दुबईहून लंडनला खास या कार्यक्रमासाठी आले होते. त्यांनी उपस्थितांना 'महाबिझ दुबई २०२६' या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय व्यवसाय अधिवेशनाविषयी सविस्तर माहिती दिली. हे अधिवेशन ३१ जानेवारी आणि १ फेब्रुवारी २०२६ रोजी दुबई येथे होणार आहे. त्यांनी या अधिवेशनाचा उद्देश - विविध उद्योगांना एकत्र आणणे, नवोन्मेष प्रोत्साहन देणे आणि भारत, यूएई तसेच जागतिक व्यावसायिक समुदायामध्ये सीमापार भागीदारी निर्माण करणे — असा असल्याचे सांगितले.

'जीएमबीएफ ग्लोबल'चे अध्यक्ष डॉ. सुनील मंजरेकर यांनी ऑनलाईन संवादातून एनआरआय व्यावसायिक आणि जागतिक उद्योजकांना 'महाबिझ दुबई २०२६' मध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की या अधिवेशनात ३,००० पेक्षा अधिक उद्योग सहभागी होणार असून, आपली उत्पादने, सेवा आणि व्यावसायिक उत्कृष्टतेचे प्रदर्शन करण्यासाठी हा एक विलक्षण जागतिक मंच ठरणार आहे.

'महाबिझ दुबई २०२६' च्या निमित्त 'लंडन' रोडशो आयोजनामागील उद्देश ब्रिटन



**ग्लोबल महाराष्ट्र बिझनेस फोरम (GMBF) तर्फे 'महाबिझ दुबई २०२६'ची लंडनमध्ये अधिकृत घोषणा करण्यात आली. 'महाबिझ २०२६' हे आंतरराष्ट्रीय व्यावसायिक अधिवेशन येत्या ३१ जानेवारी २०२६ ते १ फेब्रुवारी २०२६ रोजी दुबई येथे होणार असून त्याबद्दल डॉ. साहित्य चतुर्वेदी यांनी लंडन येथील 'द शेरेटन हिथ्रो' या पंचतारांकित हॉटेलमध्ये घोषणा केली. 'जीएमबीएफ ग्लोबल'चे अध्यक्ष डॉ. सुनील मंजरेकर यांनी ऑनलाईन संवादातून एनआरआय व्यावसायिक आणि जागतिक उद्योजकांना 'महाबिझ दुबई २०२६' मध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले.**

आणि संयुक्त अरब अमिरात यांच्यात सहयोग, समन्वय, सहकार्य आणि संबंध निर्माण करून व्यावसायिक नातं रुजवणे हा आहे. व्यापार, तंत्रज्ञान, शिक्षण आणि स्थावर मालमत्ता इत्यादी क्षेत्रांत गुंतवणूक, भागीदारी आणि ज्ञानविनिमय वाढविण्यासाठी हा कार्यक्रम उपयुक्त ठरणार आहे.

युनायटेड किंगडमचे बॅरिस्टर आणि चार्टर्ड अकाऊंटंट मधुप चतुर्वेदी यांनी दुबईच्या आर्थिक स्थितीवर सखोल सादरीकरण केले. त्यांनी दुबईतील सक्षम वित्तीय प्रणाली, उद्योग-पुरस्कृत वातावरण आणि जागतिक गुंतवणूक केंद्र म्हणून अरब - अमिरातीचे धोरणात्मक महत्त्व स्पष्ट केले.

कार्यक्रमात विविध प्रांतांतील मान्यवर आणि समाजनेते सहभागी झाले होते, त्यामध्ये डॉ. उदेश्वर सिंग (बिहार), श्री संजय (गुजरात), श्री संतोष (महाराष्ट्र), डॉ. अजय सिंग (उत्तर प्रदेश) आणि अनेक अन्य प्रतिनिधींचा समावेश होता. श्री संतोष पारकर यांनी इव्हेंट प्रेमी हे जीडीपीआर मानकांनुसार तयार केलेले ईव्हेंट व्यवस्थापन ॲप सादर केले, जे सहभागींच्या नोंदणी व संवादासाठी उपयुक्त आहे.

तरुण उद्योजक हीत सत्रा यांनी क्वालिटी कंप्लायंट सर्व्हिसेस या आपल्या कंपनीच्या आयटी सेवा सादर करत व्यवसाय क्षेत्रातील तंत्रज्ञानविषयक संधींचे सविस्तर विवेचन केले. या प्रसंगी उपस्थित असलेल्या मान्यवरांमध्ये संजय मोजरिया, डॉ. सुनील मांजरेकर, पंडित पाठक, राहुल दीक्षित, अनिल खेड्कर, राजीव बेनोडकर, छाया बेनोडकर, मोहित घाटे, मानसी लवळेकर, डॉ. मोहिनी आनंदकर, डॉ. उदेश्वर सिंग, संतोष पारकर आणि माला चतुर्वेदी यांचा समावेश होता.

कार्यक्रमाच्या समारोपाला आयोजकांनी सांगितले की 'महाबिझ दुबई २०२६' हे अधिवेशन जगभरातील व्यावसायिक नेते, गुंतवणूकदार आणि नवोन्मेषक यांच्यासाठी जागतिक स्तरावर जोडणी, सहकार्य आणि विस्तारासाठी प्रभावी व्यासपीठ ठरेल.

अधिक माहितीसाठी भेट द्या: www.mahabiz2026.com किंवा ईमेल info@gmbfglobal.com

प्रसिद्धी जनसंपर्क : राम पब्लिसिटी (राम कोंडीलकर)

मो./व्हॉट्सॲप : ९८२१४९८६५८

ईमेल : rampublicity.pr@gmail.com

---

# एनपीटी एससी-एसटी एम्प्लॉईज वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष माननीय देवानंद पवार यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**सहसंपादक मुकुंद कांबळे**

**पनवेल :** जेएनपीटी एससी-एसटी एम्प्लॉईज वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष माननीय देवानंद पवार यांचा वाढदिवस पनवेल महानगरपालिका आरपीआय गट जिल्हाध्यक्ष माननीय प्रभाकर कांबळे साहेब यांच्या कार्यालयात आनंदात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी माननीय प्रभाकर कांबळे यांच्या हस्ते केक कापून



वाढदिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमात मुकुंद कांबळे, माननीय प्रकाश कांबळे, माननीय सर्जेराव कांबळे, तुषार ओवाळ, आणि राजू भाई उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी माननीय देवानंद पवार यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा देत त्यांना पुढील वाटचालीसाठी यश, आरोग्य आणि समृद्धीच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या दरम्यान सर्व उपस्थितांनी पवार साहेबांच्या सामाजिक कार्याचा गौरव केला. त्यांच्या नेतृत्वाखाली जेएनपीटी एससी-एसटी एम्प्लॉईज वेल्फेअर असोसिएशनने केलेल्या उपक्रमांची प्रशंसा करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडले आणि शेवटी सर्वांनी वाढदिवसाचा केक वाटून आनंद साजरा केला.

---

# उगांव शिवडीकरांच्या मागणीला यश : उगांव स्टेशनवर प्रवासी गाड्यांचा थांबा सुरू

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

निफाड कोविड काळापासून बंद करण्यात आलेल्या प्रवासी गाड्यांच्या थांब्याबाबत उगांव-शिवडी परिसरातील नागरिकांचा दीर्घकालीन पाठपुरावा अखेर यशस्वी ठरला आहे.

रेल्वे प्रशासनाने उगांव रेल्वे स्टेशनवर प्रवासी गाड्यांना उद्यापासून (शुक्रवार, दि. १४ नोव्हेंबर २०२५) पासून प्रायोगिक तत्वावर थांबा देण्याचा निर्णय घेतला आहे.

या संदर्भात नागरिकांनी सातत्याने पाठपुरावा करून उच्च न्यायालयातही याचिका दाखल केली होती.

न्यायालयाच्या निर्देशानंतर रेल्वे प्रशासनाने अखेर हा निर्णय जाहीर केला आहे.

मध्य रेल्वेच्या उगांव स्टेशनवर भुसावळ–इगतपुरी एक्सप्रेस व भुसावळ–देवळाली एक्सप्रेस या गाड्यांना अतिरिक्त




थांबा देण्यात आला आहे.

या मागणीसाठी उगांव-शिवडी, खेडे, थेटाळे, वनसगाव, पानेवाडी आदी भागातील नागरिकांनी सक्रिय भूमिका बजावली. द्राक्ष बागायतदार संघाचे संचालक ॲड. रामनाथ शिंदे, शिवडीच्या सरपंच संगिता सांगळे, माजी उपसरपंच प्रभाकर मापारी, दत्तात्रेय सुडके, छोटुकाका पानगव्हाणे, मनसे तालुका सरचिटणीस अब्दुल शेख, शिवा ढोमसे, नौशाद सैय्यद, माजी उपसरपंच संजय शिंदे, दत्ता ढोमसे, अरुण क्षीरसागर, पांडुरंग कडवे, रामनाथ सांगळे आदी नागरिकांनी या संदर्भात सातत्याने पाठपुरावा केला होता.

दरम्यान, या निर्णयानंतर परिसरात आनंदाचे वातावरण असून उद्याच्या सकाळी (शुक्रवार, दि. १४ नोव्हेंबर) उगांव रेल्वे स्टेशनवर पहिल्या मेमु गाडीचे जल्लोषात स्वागत करण्यात येणार असल्याची माहिती सरपंच संगिता सांगळे यांनी दिली आहे.

**गाड्यांचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे**

- **▸▸ भुसावळ–इगतपुरी एक्सप्रेस (11119): उगांव आगमन 11.52, प्रस्थान 11.53**
- **▸▸ इगतपुरी–भुसावळ एक्सप्रेस (11120): उगांव आगमन 12.17, प्रस्थान 12.18**
- **▸▸ देवळाली–भुसावळ एक्सप्रेस (11113): उगांव आगमन 08.01, प्रस्थान 08.02**
- **▸▸ भुसावळ–देवळाली एक्सप्रेस (11114): उगांव आगमन 21.04, प्रस्थान 21.05**

---

# दिल्लीतील लाल किल्ल्या समोर झालेल्या स्फोटामागे पाकिस्तानचा हात – केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (आनंद पवार)**

राजधानी दिल्लीतील ऐतिहासीक लालकिल्या समोर एका वाहनात झालेल्या स्फोटाची घटना अत्यंत विदारक आहे.या स्फोटाचा आम्ही रिपब्लिकन पक्षाच्या वतीने तीव्र निषेध करतो. या स्फोटा मागे पाकिस्तानचाच हात आहे.त्यामुळे आंतकवादी राष्ट्र असणाऱ्या पाकिस्तानला कायमचा धडा शिकवला पाहिजे अशी संतप्त प्रतिक्रिया रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी व्यक्त केली.

दिल्लीतील लालकिल्ल्यासमोर वाहनात स्फोटकांचा झालेला स्फोट



अत्यंत भीषण आहे.त्यात अनेक निष्पाप नागरिक मृत्युमुखी पडले. अनेक जण जखमी झाले.जे नागरिक मृत्युमुखी पडले त्यांना रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आपण भावपुर्ण श्रध्दांजली वाहतो.त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात आपण सहभागी आहोत. जे जखमी झाले आहेत ते लवकर बरे व्हावे अशी मी मंगल कामना करतो असे ना.रामदास आठवले म्हणाले.या स्फोटाची सखोल चौकशी करण्याचे आदेश गृहमंत्री अमित शहा यांनी दिलेले आहेत.या स्फोटामागे जे कोणी आतंकवादी आहेत.त्यांना लवकरात लवकर अटक करुन कठोरात कठोर शिक्षा करण्यात येईल असा आम्हाला विश्वास आहे.सतत आतंकवादी घटना घडविणाऱ्या

आतंकवादी हल्ले आतंकवादी स्फोट घडविणाऱ्या पाकिस्तानला कायमचा धडा शिकवण्याची गरज असल्याचे मत ना.रामदास आठवले यांनी व्यक्त केले.

या स्फोटात जे मृत्युमुखी पडलेत,जखमी झालेत त्यांना सरकारच्या वतीने निश्चित मदत देण्यात येईल.लाल किल्ल्यात झालेल्या स्फोटाचा बदला भारत निश्चित घेईल असे ना.रामदास आठवले म्हणाले.

---

# वन विभाग ॲक्शन मोडवर ( तालुक्यात पश्चिम पट्ट्यात बिबट्याचा वावर वाढला )वडेदिगर शिवारात बिबट्या जेरबंद !

**दैनिक युवक आधार**

**बागलाण तालुका प्रतिनिधी -दीपक गायकवाड**

**बागलाण :** अधिकतर ठिकाणी हिंस्र प्राण्यांचा मुक्त संचार बघायला मिळत आहे .तालुक्यातील वडेदिगर शिवारात बिबट्याचे दर्शन नागरिकांना दिसत होते. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत होते परंतु ताहाराबाद परिक्षेत्रातील वनरक्षक विकास मोरे हे शेतकऱ्यांचे,नागरिकांची खरे संरक्षण करते ठरले असल्याचं अनुभव भयबीत शेतकरी चंद्रकांत गायकवाड यांना प्रत्ययास आले असून वनरक्षकांनी पश्चिम पट्ट्यात एका बिबट्याला बळवंत गायकवाड



यांच्या शेतात सापळा रचून कैद केलं त्यामुळे नागरिकांना भयमुक्त संचार करता येईल असे आश्वासन वनरक्षकांनी दिले त्यामुळे पश्चिम पट्ट्यातील नागरिकांमध्ये भीतीचे सावट काहीअंशी कमी झालेले आहे. वेळेतच हिंस्र प्राण्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी शेतकरी व नागरिकांकडून जोर धरत होती. वनपरि क्षेत्राधिकारी ज्ञानेश्वर शर्माळे यांच्या मार्गदर्शनावरून वनरक्षक विकास मोरे,वनरक्षक ज्ञानेश्वर जे सोनवणे , वनपरिमंडळ अधिकारी दादाजी पूनाजी गवळी,माणिक मोरे वनरक्षक, वन मजूर शत्रुघ्न पवार, वसंत अहिरे, वारू बागुल, हिरामण बागुल,सुरेश बागुल व ग्रामस्थ शेतकरी यांनी बिबट्यास जेरबंद करण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले.

नागरिकांनी सतर्क राहावे बिबट्या नराचे साथीदार मादी, बछडे यांचा अद्याप मुक्त संचार आहे रात्रीच्या वेळी एकट्याने बाहेर जाणे टाळावे लवकर बाकीच्यांचा बंदोबस्त करण्यात येईल.

# शिवडी येथे दिवसाढवळ्या घरफोडी; ६१ हजारांचा ऐवज लंपास

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

**निफाड:** निफाड तालुक्यातील शिवडी शिवारातील म्हसोबा टेकडीजवळ राहणाऱ्या गोरख जेऊघाले यांच्या घरी दिवसाढवळ्या घरफोडीची धक्कादायक घटना घडली आहे. अज्ञात चोरट्याने मागील दरवाज्यातून घरात प्रवेश करून सोन्या–चांदीचे दागिने, रोख रक्कम आणि मोबाईल असा एकूण सुमारे एकसष्ठ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला आहे.



घटनेविषयी सविस्तर माहिती अशी की, दि. ११ नोव्हेंबर रोजी सकाळी गोरख जेऊघाले हे पत्नी सविता यांच्यासह शेतात कांदा बी लावण्यासाठी गेले होते. त्यांचा मुलगा हर्ष हा त्या वेळी शाळेत गेला होता. दुपारी सुमारास एक वाजता सविता जेऊघाले घरी परत आल्यावर घरातील कपाटातील सामान अस्ताव्यस्त अवस्थेत दिसले. त्यांनी तत्काळ आवाज दिल्यावर गोरख जेऊघाले हेही घरी आले. त्यानंतर तपासाअंती घरातील सोन्याचे दागिने, चांदी, रोख रक्कम आणि सॅमसंग कंपनीचा मोबाईल चोरीस गेल्याचे लक्षात आले.

चोरीची माहिती मिळताच निफाड पोलिसांना कळविण्यात आली. पोलिस श्वानपथकासह घटनास्थळी दाखल झाले आणि पंचनामा करण्यात आला. सुमारे १२ ग्रॅम सोन्याचे दागिने, चांदी, रोख रक्कम आणि मोबाईल फोन असा एकूण ६१ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेल्याची फिर्याद गोरख जेऊघाले यांनी निफाड पोलिस ठाण्यात दाखल केली आहे.

या प्रकरणी भारतीय दंड संहिता कलम ३८० अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून, पोलिस निरीक्षक गणेश गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल भास्कर पवार अधिक तपास करत आहेत.

सदर घटनेमुळे परिसरात चोरीच्या घटनांबाबत भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांमध्ये पोलिसांकडून सुरक्षा उपाययोजना वाढविण्याची मागणी होत आहे.

# समाजान धम्म अंगिकरणासाठी विविध संस्कार शिबीराची आवश्यकता: जिल्हाउपाध्यक्ष शालिग्राम पठाडे

**दैनिक युवक आधार**
**रिसोड (तालुका प्रतिनीधी). रणजितसिह. ठाकूर.**

येथे दि. १० नोव्हेंबर २०२५ ला भारतीय बौद्ध महासभा तालुका रिसोड व समता सैनिक दल यांचा संवाद मिळावा संपन्न झाला. या मेळावा कार्यक्रमाचे अध्यक्ष माधवराव हिवाळे होते. तर प्रमुख मार्गदर्शक जिल्हाउपाध्यक्ष शालिग्राम पठाडे, जनरल मेजर अश्विन खिल्लारे, प्रमुख उपस्थितीत जिल्हा सरचिटणीस देवानंद वाकोडे. होते. यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून लाभलेले भारतीय बौद्ध महासभा जिल्हा सरचिटणीस देवानंद वाकोडे होते.

सर्वप्रथम जनरल मेजर अश्विन खिलारे यांनी समता सैनिक दलाची परेड घेतली. नंतर मानवरांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले मान्यवरांच्या हस्ते पुष्प व पुष्प हार अर्पण करून अभिवादन



करण्यात आले. जिल्हा संस्कार प्रमुख शालिग्राम पठाडे सर यांनी उपस्थितांना त्रिसरण पंचशील दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामजी बनकर कोषाध्यक्ष यांनी केले जिल्हा संस्कार प्रमुख शालिग्राम पठाडे सर यांनी विविध संस्कार शिबिराबद्दल माहिती सांगितली , महिलासाठी उपासिका धम्म प्रशिक्षण, तर पुरुषांसाठी श्रामणेर शिबिर, महत्त्वाचे आहे. इतरही व्यवसाय प्रशिक्षण शिबीर, अंधश्रद्धा निर्मूलन शिबीर, आरोग्य शिबीर, बालसंस्कार शिबीर असे विविध शिबीर घेऊन समाजात धम्मानुसार आचरण व समाज हा सुसंस्कृत बनण्यासाठी समाजाला भारतीय बौद्ध महासभेकडुन होणा-या शिबीरात सहभागी होऊन प्रशिक्षण घ्यावे अशा प्रकारे विस्तृत माहिती सांगितली. जिल्हा मेजर जनरल अश्विन खिलारे यांनी समता सैनिक दलाचे महत्त्व सांगितले व समता सैनिक दलामध्ये नियम काय असतात हे सुद्धा उपस्थित समता सैनिक दलांना सांगितले. समता सैनिक दलाच्या कामकाजाबद्दल संपूर्ण माहिती सांगितली जिल्हा सरचिटणीस देवानंद वाकोडे सर अभिमन्यू पंडित सर तालुका संरक्षण प्रमुख गणेश कवडे सर पंजाब नरवाडे सर नारायण मोरे सर माणिक खिलारे साहेबराव नवघरे सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

भारतीय बौद्ध महासभेत तालुका अध्यक्ष तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष माधवराव हिवाळे आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी सांगितले की आम्ही रिसोड तालुक्यात जास्तीत जास्त शिबिर राबवू राबवू सैनिक बनवू असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला उपस्थित शेलगाव राजगुरे, गोवर्धना, येवता, मसला पेन, बाळखेडा, जांब, गोंढाळा, केनवड, करडा, इत्यादी गावचे समता सैनिक दल उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देविदास सोनुने तालुका सरचिटणीस यांनी केले. व आलेल्या सर्व प्रमुख पाहुण्याचे आभार कैलास सुर्वे यांनी मानले शेवटी सरणातय घेऊन कार्यक्रमाचे सांगता करण्यात आली.

# इसाई प्रार्थना सभेद्वारे दैवी शक्ती, अंधश्रद्धा पसरवण्यांबद्दल निषेध

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती कडून नागपूरच्या पोलिस आयुक्तांना लिहिलेले तक्रार पत्र मध्ये नागपूरमधील कस्तुरचंद पार्कमधील एका प्रार्थना महोत्सवात अंधश्रद्धा विरोधी कायद्याचे उल्लंघन करणारे दावे केले जात असल्याचा आरोप या पत्रात करण्यात आला आहे. तक्रार ७ नोव्हेंबर २०२५ रोजीची आहे. यात तीन दिवसांच्या प्रार्थना महोत्सवातील एका व्हिडिओचा संदर्भ आहे जिथे असा दावा केला जातो की प्रार्थना सर्व आजार आणि समस्या बरे करू शकते. समितीने असे म्हटले आहे की असे दावे करणे हा अंधश्रद्धा विरोधी कायद्यानुसार दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हा आहे. पत्रात असेही नमूद केले आहे की,



प्रार्थनेने आजार बरा होऊ शकतो हे सिद्ध करणाऱ्या प्रत्येकासाठी समितीने २१ लाख रुपयांचे आव्हान ठेवले आहे, हे आव्हान ३५ वर्षांपासून पूर्ण झालेले नाही.

नागपूर येथील कस्तुरचंद पार्क येथे ख्रिश्चन समुदायाच्या प्रार्थना महोत्सवादरम्यान अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या आक्षेपार्ह कृत्यांवर तात्काळ गुन्हा दाखल करण्याबाबत तक्रार पर निवेदन पत्र स्थानिक पोलीस आयुक्त आणि पोलीस उपआयुक्त यांना देण्यात आली. आणि ह्या प्रकरणात तत्काळ कारवाई करण्यात येईल असे पोलीस आयुक्त यांनी आश्वासन दिले आणि आदेश जारी केले.तीन दिवसांच्या प्रार्थना उत्सवाचा व्हिडिओ एका YouTube चॅनेलवर पाहिला गेला. त्यात असा दावा केला आहे की प्रार्थनेद्वारे सर्व आजार, दुःख, अडचणी आणि समस्या दूर केल्या जाऊ शकतात. हे आक्षेपार्ह आहे आणि भारतीय संविधानाचे उल्लंघन करून जनतेची दिशाभूल करणारे आहे. म्हणून, नागपूरच्या कस्तुरचंद पार्कमध्ये होणारा हा उपक्रम तात्काळ थांबवावा. प्रार्थनेद्वारे त्यांचे आजार बरे करण्याचे आश्वासन देऊन निष्पाप आणि भोळ्या लोकांना फसवणाऱ्या लोकांवर अंधश्रद्धा आणि जादूटोणा विरोधी कायद्यांतर्गत २०१३ अंतर्गत योग्य कारवाई करावी अशी आमची विनंती आहे. अन्यथा, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती जनतेच्या हितासाठी आणि कायद्याच्या अंमलबजावणीसाठी लोकशाही आणि शांततापूर्ण निषेध करेल. ही कृती त्वरित थांबवावी अशी विनंती करण्यात आली. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, नागपूर तर्फे राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे, नागपूर जिल्हा सरचिटणीस डॉ. सुनील भगत,कार्यकारी अध्यक्ष चित्तरंजन चौरे, देवानंद बडगे, अध्यक्ष, उत्तर नागपूर शाखा, देवयानी भगत, वैज्ञानिक जागृती प्रकल्प सचिव, नागपूर जिल्हा, मंगला गाणार, अध्यक्ष, दक्षिण नागपूर शाखा, निखिल बोरिये, धम्मरक्षित मुरमाडकर दाम्पत्य आणि इतर मान्यवर सदस्य यांनी ह्या शिष्टमंडळ मध्ये सहभागी होऊन ह्या प्रार्थना सभेचा अंधश्रद्धा पसरवण्यांबद्दल निषेध व्यक्त केला.

# कळंब-निमसाखर मार्गावर मानवी पायाचा अर्धा भाग आढळला

## वालचंदनगर पोलिसांना तपासाचे मोठे आव्हान

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील कळंब - निमसाखर मार्गावर कळंब गावच्या हद्दीत चौदा चाळ नजिक आज बुधवारी १२ नोव्हेंबर रोजी सकाळी एक अत्यंत धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. रस्त्याच्या कडेला चक्क मानवी शरीराच्या अवयवाचा अर्धा भाग आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हा अवयव पुरुष जातीच्या व्यक्तीचा डाव्या पायाचा गुडघ्यापासून खालील भाग आहे. वाहतुकीच्या वर्दळीच्या रस्त्यावर हा भाग पडलेला असल्याने, ही घटना स्थानिक नागरिकांसाठी एक गूढ



बनली आहे.आज सकाळच्या सुमारास ही बाब काही लोकांच्या निदर्शनास येताच त्यांनी तातडीने वालचंदनगर पोलिसांना माहिती दिली.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वालचंदनगर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजकुमार डुणगे हे तातडीने आपल्या पथकासह घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून पायाचा भाग ताब्यात घेतला आहे. हा अवयव इथे कसा आला, कोणत्या घटनेमुळे शरीरापासून वेगळा झाला याबाबत वालचंदनगर पोलीस सखोल तपास करत आहेत.प्राथमिक तपासानुसार, हा खुनाचा प्रकार असू शकतो का,या दिशेने देखील पोलीस यंत्रणा तपास करत आहे.

याबाबत वालचंदनगर पोलीस स्टेशन ने संबंधित घटनेबाबत नागरिकांना आवाहन केले असून संबंधित पायावरून ओळख पटल्यास तात्काळ पोलीस स्टेशनला संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे. या प्रकारामुळे कळंबसह परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.या घटनेचा अधिक तपास वालचंदनगर पोलीस करत आहेत.

# मूल्यवर्धन प्रशिक्षनाचा आज झाला समारोप



**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी व्ही डी खुडे**

मूल्यवर्धन प्रशिक्षण दिनांक 10नोव्हेंबर 2025पासून सुरु होते आज प्रशिक्षणाचा शेवटचा दिवस होता. हे प्रशिक्षण तालुक्यातील सर्व शिक्षकांचे होणार असून पहिल्या बॅच चे 7केंद्रातील 50%या प्रमाणे उपस्थिती होती उर्वरित शिक्षकांचे उद्या पासून सुरु होणार आहे या प्रशिक्षण समारोपीय कार्यक्रम मध्ये सोनुने साहेब गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती कळमनुरी व गोरे साहेब विस्तार अधिकारी कळमनुरी प्रमोद दिपके सर राज्य सुलभक मूल्यवर्धन प्रशिक्षक हिंगोली तथा तालुकाध्यक्ष महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती कळमनुरी यांचे उपस्थिती त समारोप झाला असून सदर कार्यक्रमात SMF पुणे चे सुमेध भालेराव जिल्हा प्रकल्प समन्वयक व विजय खुडे तालुका प्रकल्प समन्वयक कळमनुरी. अंभोरे सर साधनवेक्ती हे उपस्थित होते

> “ आमच्या शिक्षकांना या प्रशिक्षण हे खूप ऊर्जा मिळाली असून या मुळे मूल्यवर्धन राबविण्यासाठी अधिक मदत झाली
>
> - प्रमोद दिपके सर
> राज्य सुलभक मूल्यवर्धन प्रशिक्षक हिंगोली तथा तालुकाध्यक्ष महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती कळमनुरी

# भीतीच्या छायेत मगर पकडली

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- सचिन पवार**

**माणगांव:-** खांदाड गावात गेल्या तीन वर्षांपासून सुरू असलेल्या मगरदर्शनाच्या घटनांमुळे ग्रामस्थ भयभीत वातावरणात जीवन जगत होते. अखेर मंगळवारी रात्री गावातील तरुणांनी मोठ्या धाडसाने एक मगर जिवंत पकडून दिलासा दिला. मागील काळात ग्रामस्थांनी वनविभागाचे थेट लक्ष वेधून घेतले, माध्यमांतूनही सातत्याने पाठपुरावा केला, तसेच माणगाव नगरपंचायतचे माजी अध्यक्ष ज्ञानदेव पोवार यांनीही ठोस कारवाईची मागणी केली होती. तरीही फक्त हिरव्या जाळीची फेन्सिंग आणि “सावधान, मगरींची प्राबल्य” अशा फलकापलीकडे ठोस उपाययोजना दिसून आली नाही. त्यामुळे मगरींची संख्या वाढत गेली आणि कोंबड्या, कोंबडे, पिल्ले व लहान पाळीव प्राण्यांवर हल्ले सुरूच राहिले.



दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री ८.१० वाजता भीमसेन वलेराव यांच्या घरासमोर मगरीचे दर्शन झाल्याची बातमी पसरताच गावातील असंख्य तरुण घटनास्थळी जमा झाले. मंडळाचे अध्यक्ष महेश पोवार (बाळा डी.जे.) आणि सहकाऱ्यांनी कौशल्याने व कोणतीही इजा न करता मगरीला झडप घालून पकडण्यात यश मिळवले. युवक निखिल वले यांनी आमच्या प्रतिनिधींना माहिती दिली व त्यानंतर तालुका वनअधिकारी प्रशांत शिंदे यांना कळविण्यात आले. वनपथक घटनास्थळी पोहोचले, मात्र आवश्यक पकड उपकरणांचा अभाव असल्याने काही काळ तणाव निर्माण झाला. अखेर गावकऱ्यांनी पकडलेली मगर वनपथकाच्या ताब्यात दिली व नंतर पिंजरा आणून तिला वाहनात सुरक्षितरीत्या हलविण्यात आले.

गावकऱ्यांची मागणी आहे की पकडलेल्या मगरीला दूरवर समुद्रवाहिनीच्या परिसरात सुरक्षित सोडण्यात यावे, अन्यथा ती पुन्हा गावात प्रवेश करू शकते. प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू राहिली; सुमारे दहाच्या सुमारास सर्व औपचारिकता पूर्ण झाली. दरम्यान अनेक वृत्तवाहिन्यांचे प्रतिनिधी घटनास्थळी दाखल झाले व ग्रामस्थांचा संताप समोर आला. वनविभागाच्या विलंबित व अपुऱ्या कारवाईविरुद्ध ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. “गावकऱ्यांनी स्वतःच्या जिवाची पर्वा न करता मगर पकडली, पण वनविभागाकडून अजूनही ठोस आणि कायमस्वरूपी उपाययोजना दिसत नाहीत. भविष्यात एखादी गंभीर दुर्घटना घडण्यापूर्वी त्वरित पावले उचलावीत,” अशी ग्रामस्थांची स्पष्ट मागणी आहे.

# धावत्या इंटरसिटी एक्सप्रेसमध्ये थरार!; पाण्याच्या बाटलीच्या वादातून खंजरने भोसकून तरुणाचा खून

**दैनिक युवक आधार**
**उमरी प्रतिनिधी**
**रूपेशकुमार ग.श्रीरामवार :**

रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आणणारी एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. अकोला ते काचीगुडा दरम्यान धावणाऱ्या इंटरसिटी एक्सप्रेसमध्ये किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून एका ३० वर्षीय तरुणाचा खंजरने भोसकून खून करण्यात आला. ही हृदयद्रावक घटना १० नोव्हेंबर रोजी दुपारी पावणेचार वाजताच्या सुमारास घडली.

या घटनेत मरण पावलेल्या तरुणाचे नाव आतिश हैबते (वय ३०, रा. उमरी) असे आहे

मंगळवारी दुपारी सव्वातीन वाजताच्या सुमारास इंटरसिटी एक्सप्रेस उमरी स्थानकात थांबली. मृत आतिश हैबते हा तरुण गाडीमध्ये पाण्याच्या बाटल्या विकण्यासाठी चढला होता.



पाणी देण्याच्या कारणावरून त्याचा गाडीतील दुसऱ्या एका तरुणाशी तीव्र वाद झाला.हा वाद इतका विकोपाला गेला की, त्या दुसऱ्या तरुणाने त्वेषात येऊन आपल्याजवळील खंजरने आतिश हैबते याच्या पोटात वार केले. रक्ताच्या थारोळ्यात आतिश रेल्वेतच कोसळला आणि त्याचा जागीच मृत्यू झाला.

हा प्रकार पाहून प्रवाशांमध्ये मोठी खळबळ उडाली. एका महिला प्रवाशाने आरोपीला पकडण्यासाठी आरडाओरड केली, परंतु कोणीही मदतीला धावले नाही आणि आरोपी तिथून पळून जाण्यात यशस्वी झाला. आरोपी हा देखील उमरीचाच असल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान, गाडी धर्माबाद शहराच्या पुढे गेल्यानंतर या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. निजामाबाद रेल्वे स्थानकात मयत तरुणाचे प्रेत गाडीतून खाली उतरवून घेण्यात आले. ही घटना नांदेड रेल्वे पोलिसांच्या हद्दीत घडल्याने, नांदेड रेल्वे पोलिसांनी तत्काळ तपासाची चक्रे फिरवली रेल्वे पोलिसांनी या घटनेचा गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आणि अवघ्या काही तासांतच आरोपीला तेलंगणातील निजामाबाद जिल्ह्यातील आरमुर येथून ताब्यात घेण्यात यश मिळवले आहे. पोनि वाघमारे पुढील तपास करत आहेत.

**दोन आरोपींना तेलंगणातून अटक**

छत्रपती संभाजीनगर अधीक्षक स्वाती भोर यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी प्रकाश वाघमारे व स्थागुशाचे प्रभारी अधिकारी प्रशांत गंभीरराव यांच्या अंतर्गत दोन टीम निजामबादकडे रवाना करण्यात आल्या होत्या. या कारवाईत एपीआय जोगदंड, संजय भेंडेकर, पंकज पुरी, योगेश गिरी, कांचन राठोड, श्री. सूर्यवंशी, प्रवीण धाडवे, गजानन चिलकेवार, अक्षय यादव यांचा सहभाग होता.

**प्रवाशांची सुरक्षा ऐरणीवर**

या घटनेमुळे धावत्या रेल्वेतील प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा गंभीर बनला आहे. प्रवाशांचे म्हणणे आहे की, रेल्वे सुरक्षा दल आणि पोलीस कर्मचारी हे फक्त एसी आणि आरक्षित डब्यांमध्येच फिरतात, पण जनरल डब्यांमध्ये त्यांचे फारसे लक्ष नसते. यामुळे गाडीत चोर, खिसेकापू आणि खुनी प्रवृत्तीच्या लोकांचा वावर वाढला असून प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या घटनेने रेल्वेतील सुरक्षा व्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# उदयगिरीच्या केतकी चवळेची शालेय राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी जोगेंद्र सोमवंशी लातूर.**

**उदगीर:** महाराष्ट्र उदयगिरी कनिष्ठ महाविद्यालय उदगीर येथील खेळाडू कु. केतकी चवळे यांनी क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य आणि जिल्हा क्रीडा कार्यालय अंतर्गत नांदेड येथे संपन्न झालेल्या शालेय विभागीय 19 वर्षाखालील तलवारबाजी ( क्रीडा प्रकार सेबर ) स्पर्धेत सांघिक प्रथम तर वैयक्तिक तृतीय क्रमांकाने विजेतेपद पटकावले आहेत.

या यशाबद्दल महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर यांच्या हस्ते कु. केतकी चवळे यांचा ग्रंथ, शॉल व बुके देऊन सत्कार करण्यात आला व पालक




विजयकुमार चवळे यांचाही संस्था व महाविद्यालयाच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थेचे सहसचिव प्रशांत पेन्सलवार, प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, उपप्राचार्य डॉ. एस. एन. हल्लाळे, उपप्राचार्य प्रा. शिवशंकर कोडचे, डॉ. कमलाकर गव्हाणे उपस्थित होते. सदर खेळाडूची संभाजीनगर येथे होणाऱ्या शालेय राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या खेळाडूला क्रीडा संचालक प्रा. सतिश मुंढे, प्रा. रमजू शेख यांनी मार्गदर्शन केले आहे. त्याबद्दल खेळाडूचे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे सर्व पदाधिकारी आणि महाविद्यालयाच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.